


# छात्र प्रबोधन

सौर आषाढ, शके १९३५।
वर्ष १३ अंक १०
मूल्य रुपये पंधरा


विद्यार्थी विशेषांक

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक !

Tag No. CP131041 ActiveLink | व्हिडिओ पाहा

# पिल्लल्लारा पापल्लारा

पिल्लल्लारा पापल्लारा, रे पठी भारत पौरूल्लारा
पेद्दलके वक दारिनि चुपे पिल्लल्लारा ।।धृ।।
मीकन्नुळ्ळो पुन्नमिजाबिलि उन्नाडु
उन्नाडु पुनसुन्नाडु
मी मनसुळ्ळो देवुडुं कोलुवै उन्नाडु
उन्नाडु अत डुन्नाडु
भारत मातकु मुददुल पापलु मीरेले, मीरेले
अम्मकु मी पै अन्तेलेनी प्रेमेले प्रेमेले
पिल्ललारा पापल्लारा ।।१।।



भारत देशम् वोकटे इल्लू
भारत माताकु मीरे कळ्ळु,
मीरे कळ्ळु मीरे कळ्ळु
जातिपताकम् पैकेगरेसि
जाति गौरवम्कापाडंडि
बडिलो बयटा अन्ता कलिसि
भारतीयुर्ल्ले मेलगंडि
कन्याकुमारिकी काश्मिरानिकी
अन्योन्यतनु पेन्चंडि
विडति बन्धमु वेयंडि
पिल्ललारा पिल्ललारा ।।२।।

**चित्रकार : कु. रेवती पाटील** (इ. १० वी)

(वरील तेलुगु पद्याचा भावार्थ पान क्र. १८ वर पाहा.)

# छात्र प्रबोधन

**सौर आषाढ, शके १९३५। वर्ष १३ अंक १०**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २५२ वा अंक, वर्ष २१ अंक १२

**विद्यार्थी विशेषांक** प्रकाशन दिनांक - १० आषाढ, शके १९३५/१ जुलै २०१३


ॐ

***इवली शल्ये रुपती खुपती***
***मात करू दे त्यांच्यावरती***
***प्रगल्भतेचे पंख देऊनी***
***ने ज्योतिर्जगतात***

## • अंतरंग •


| | | |
|---|---|---|
| २. | **संवाद** | - महेन्द्र सेठिया |
| | **मनोगत** | - कु.मृण्मयी परळीकर, कु.अवंती पोरे, चि. शौनक हिंगे |
| ३. | कथा... **मंगळावरील महामानव** | - चि. अद्वैत थत्ते |
| ५. | ललित... **अस्तित्व...** | - कु. अवनी खोडकुंभे |
| ६. | कविता... **ऋतू** | - कु. मुक्ता हळबे |
| ७. | मुलाखत... **संवाद एका उद्योजकाशी श्री. श्रीकांत पडगिलवार** | - कु. गुंजन, कु. गौरी, कु. साक्षी, कु. शिवानी |
| १०. | कलाकौशल्य ... **कॉफी पेंटींग** | - कु. प्रतिमा मेंढे |
| ११. | अनुभवपर... **थरार स्कूबा डायव्हिंगचा** | - चि. रुचिर कुलकर्णी |
| १३. | पाहिलेच पाहिजे असे काही... **द कराटे किड** | - कु. मृण्मयी परळीकर |
| १५. | ललित... **दुर्मिळ ते इंद्रधनू** | - कु. सायली पाटील |
| १६. | कविता... **सबलेचे रूप** | - कु. सिद्धी नलावडे |
| | **मैत्री** | - कु. ईशा लवळेकर |
| १७. | ललित... **काही उमगले काही गवसले** | - कु. आर्या बर्वे |
| १९. | माहितीपर... **रेन वॉटर हार्वेस्टिंग** | - चि. वरद बनसोड |
| २१. | साहस सहल... **गोरखगड-सिद्धगड-भीमाशंकर गिरिभ्रमण सहल** | - चि. तेजस घाडगे |
| २३. | मुलाखत... **'स्व'ला ओळखताना कु. अपूर्वा राणे** | - कु. अवंती पोरे |
| २६. | अनुभव...**पाऊले चालती पंढरीची वाट** | - कु. मृण्मयी परळीकर |
| २७. | ललित...**सुसंगती सदा घडो** | - कु. सायली मुळ्ये |
| २९. | ललित...**घंटा बोले कुलूपाला** | - कु. साक्षी नानोटे |
| ३२. | **कुमार वाचकांच्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'** | |
| | शेजारील पानावरील पद्य... **पिल्ललारा पापल्लारा** | |

**याशिवाय** - आगळी-वेगळी गुरुपौर्णिमा (९), पद्याचा अर्थ (१८), पूर्ण कविता मिळवा आणि आम्हाला कळवा (२५), कोडी (२८), हा.. हा.. हा.., काव्यसंदेश (३०,३१)


● पानाखालील **तळटिपेतील माहितीपर ओळीत** छंद जोपासण्यासाठी काही संकेतस्थळे दिली आहेत. ● छात्र प्रबोधनच्या कार्यानुभव उपक्रमातील एका गटाने **पानाखालील कवितेच्या ओळी** म्हणून पावसाळ्यावरच्या पद्यपंक्तींचे संकलन केले आहे.

**मुखपृष्ठाविषयी–** प्रतापगडाजवळ असलेल्या धबधब्याच्या मी काढलेल्या फोटोवरून मी हे चित्र काढले आहे. धबधब्याची आऊटलाइन काढून घेतली. मग शेवाळ चढलेले दगड, झाडे, पानांचे बारकावे उठावदार होण्यासाठी जलरंगाचा वापर केला. **– चि. आदित्य गोवंडे**


♦ **संपादक, प्रकाशक, मुद्रक** ♦
महेन्द्र सेठिया

♦ **कार्यकारी संपादक** ♦
शिल्पा कुलकर्णी

♦ **विद्यार्थी संपादक मंडळ** ♦
कु. मृण्मयी परळीकर,
कु. अवंती पोरे, चि. शौनक हिंगे

♦ **संपादक मंडळ** ♦
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन

♦ **मुखपृष्ठ** ♦
चि. आदित्य गोवंडे



♦ **संपर्क पत्ता** ♦
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९
संकेतस्थळ-www.chhatraprabodhan.org
ई-मेल-
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org


**ऐकाऽ हो ऐकाऽऽ**
**'छात्र प्रबोधन' मधील साहित्याला**
**'ऑडिओ-व्हिडिओ' ची पूरक जोड !!**
**संगणकावर पाहा/ऐका**
तपशीलासाठी -पृष्ठ क्र. **२५** वर पाहा.
(तपशीलासाठी -पृष्ठ क्र. २५ वर पाहा.)
**सौजन्य : श्रीनिवास कुलकर्णी**
**राहुल भानोसे, सुमेध फाटक**


**मासिकाची वर्गणी :** वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०, त्रैवार्षिक: ₹ ५००, दशवार्षिक: ₹ १,५००.
**या अंकाची किंमत : ₹ १५**
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा, घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा)

**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.**


**चिंब चिंब भिजतो आहे। भिजता भिजता मातीमध्ये, पुन्हा एकदा रुजतो आहे।।**

**जरूर शोधा...** www.readbookonline.net (दर्जेदार लेखकांची इंग्रजी पुस्तके)

**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!**

## संवाद

***भाषा समृद्ध करू इच्छिणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,***

*'छात्र प्रबोधन'च्या एकविसाव्या वर्षातला शेवटचा अंक 'विद्यार्थी विशेषांक' म्हणून प्रकाशित होतोय, याचा मनापासून आनंद होतोय. कु. मृण्मयी, कु. अवंती आणि चि. शौनक यांनी संपादकीय कामांचा अनुभव घेत, महिनाभर चिकाटीने काम करून, हा अंक पूर्णत्वाला नेला त्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक! कोणतेही काम मनापासून, झोकून देऊन, जबाबदारीने आणि शिकण्याची तयारी ठेवत केले तर कामातल्या आनंदाबरोबरच काम करता करता आपण थोडे 'मोठ्ठे' झालो याचा अनुभव आल्याशिवाय राहात नाही. येत्या वर्षात विविध निमित्ताने तुमच्यातील अनेकांनी असे अनुभवशिक्षण घ्यावे व स्वत:मधला आत्मविश्वास वाढवावा ही अपेक्षा! या तिघांबरोबर अंकातील चित्रकार व लेखक विद्यार्थ्यांचेही मनापासून कौतुक!*

*या अंकात एकाआडएक पानांवर वरच्या कोपऱ्यात 'झिम्मड पावसाची' म्हणून एक चित्रमालिका छापली आहे. पावसाची विविध रूपे व पावसाळी वातावरणाची झलक दाखविणारी ही वेगवेगळी चित्रे! तुम्हाला त्यांचे शब्दांमध्ये वर्णन करता येईल का? मराठी, इंग्रजी, हिंदी, संस्कृत अशा वेगवेगळ्या भाषांमध्ये या पावसाच्या विविध रूपांचं किती वेगवेगळ्या पद्धतीने वर्णन करता येईल? कोणकोणती विशेषणं, क्रियापदं, रूपकं, वाक्प्रचार, म्हणी तुम्ही यासाठी वापरू शकाल? यासाठी तुम्हाला शब्दांशी दोस्ती करावी लागेल (शब्दसंग्रह वाढवावा लागेल. त्यासाठी विपुल वाचन करायला हवं. अन् शब्दकोश वापरायची, वाचायची सवय लावून घ्यायला हवी), भाषेच्या रचनेशी, व्याकरणाशी दोस्ती करावी लागेल. तसेच विविध प्रकारचे अनुभव प्रत्यक्ष घ्यायलाही लागतील. यावर्षी पावसाच्या विविध रूपांचं, विविध परिस्थितीतल्या (भौगोलिक, सामाजिक) पावसाचं ठरवून दर्शन घ्या, प्रत्यक्ष अनुभव घ्या आणि हे अनुभव आळस, कंटाळा न करता वेगवेगळ्या भाषांमध्ये लिहून काढायचा प्रयत्न करा. विविध शब्दकोशांचा वापर करून नेमके शब्द शोधून ते वापरा. पावसावरच्या इतरांच्या कविता, लेख वाचून त्यातूनही तुम्हाला काही शब्द/ कल्पना सापडतील. त्या जशाच्या तशा न घेता, तुमच्या शब्दात, तुमच्या अनुभवाच्या अनुषंगाने त्याचा वापर करा. लेखी वा तोंडी स्वरूपात भाषेचा जेवढा वैविध्यपूर्ण वापर तुम्ही कराल तेवढी तुमची भाषा अधिक समृद्ध होईल. 'पावसाळा' हे एक निमित्त तुमच्या कल्पना, भावना, अनुभव शब्दबद्ध करता करता भाषा समृद्ध करण्याचं! तुमचं लेखन पाठवाल ना?*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**

## मनोगत

*''ताई केवढा पाऊस पडतोय... प्लीज, आजच्या दिवशी उशिरा आलं तर चालेल का?'', ''केवढं काम पडलंय... ते काही नाही, तू उलट लवकरच यायला हवं'', हे होते आमचे अंकाच्या संपादनाचे काम करतानाचे संवाद. 'छात्र प्रबोधन' च्या विद्यार्थी विशेषांकाचं काम करायला मिळाल्याने आम्हाला स्वप्नपूर्ती झाल्यासारखंच वाटलं. सुरुवातीला जरी कामाचा वेग हवा तितका नसला, तरी नंतर तो वाढला आणि ताण आला तरी काम वेळेत पूर्ण झालं. सुरुवातीला आम्ही नियोजन करण्यात थोडे कमी पडलो, पण नंतर योग्य नियोजन केल्याने आमचे काम पूर्ण झाले. आयुष्यात नियोजनाचे किती महत्त्व असते, हे आम्हाला वेळ कमी पडल्यावर कळले. या कामामुळे फक्त नियोजनच नाही, तर प्रत्येक गोष्टीकडे विविध अंगांनी आम्ही पाहायला शिकलो. आमची कल्पनाशक्ती समृद्ध झाली. विविध व्यक्तींबरोबर भेटी झाल्या. त्यामुळे संवाद कौशल्य वाढलं. सुरुवातीपासूनच आव्हानात्मक वाटलेले काम आम्ही पूर्ण करू शकलो, त्यामुळे आमचा आत्मविश्वास वाढला.*

*मित्रांनो, हे असं मासिकाच्या संपादनाचं काम आमच्यासाठी जरी नवीन असलं, तरीही आम्हाला मजाही येत होती आणि अनेक अनुभवही मिळत होते. चित्रकला, अभिनय यांसारख्या अनेक कार्यशाळा आयोजित केल्या जातात, पण संपादनाची कार्यशाळा असते का? नाही ना? 'छात्र प्रबोधन'च्या विद्यार्थी विशेषांकाचे संपादन करणे ही आमच्यासाठी एक कार्यशाळाच होती. मग तुम्ही पण संधी मिळेल तेव्हा 'छात्र प्रबोधन'च्या कामात सहभागी होताय नं?*

**– कु. मृण्मयी परळीकर, कु. अवंती पोरे, चि. शौनक हिंगे**

भुईवर आली सर पावसाची । भुईतून आली रुजव वाळ्याची ।।

**जरूर शोधा...** www.bharatcoins.com (नाण्यांची छायाचित्रे, माहिती)

**प्रायोजक – व्ही. व्ही. आर्किटेक्ट प्रा. लि., पुणे.**

# मंगळावरील महामानव

**– चि.अद्वैत थत्ते**

**प्रोफेसरांच्या क्वॉर्टर्सची कसून झडती घेतल्यावर पीटर कुकच्या हाती या केसमधील महत्त्वाचा धागा सापडला. तो एका रोबोचा साईनबोर्ड होता...**


अंधारी रात्र होती. रात्रीचे ११.५० वाजले होते. प्रोफेसर शंकू आपल्या प्रयोगशाळेत प्रयोग करत होते. ते 'एरॉनॉटिकल रोबोटिक्स' या विषयाचे प्राध्यापक होते. त्यांच्या संगणकाच्या पडद्यावर रोबोचे डेटाबेस दाखवले जात होते.

रात्री १२ चे ठोके पडले. त्याक्षणी इ. स. २०८१ चा प्रारंभ झाला. मंगळावर एकच जल्लोष सुरू झाला; कारण मानवाने मंगळावर वस्ती करून १५ वर्षे पूर्ण झाली होती. प्रोफेसर शंकूंनी आपला मेंदूशी जोडलेला संगणक बंद केला व ते खोलीत जाऊन झोपी गेले. सकाळ झाली. प्रोफेसर शंकू उठले व आपला मुख्य रोबो 'मॅग्ना' याला हाक मारली. मॅग्ना हा असा रोबो होता, की जो कृत्रिम बुद्धीवर चालत असे. म्हणजेच तो माणसाप्रमाणे विचार करून निर्णय घेऊ शकत होता. खूप वेळा बोलावूनही 'मॅग्ना' आला नाही म्हणून ते बाहेरच्या खोलीत आले. तेथिल दृश्य बघून त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. मॅग्नाचे असंख्य तुकडे सर्वत्र पसरले होते. त्यांनी ताबडतोब MIT म्हणजेच Mars Intelligence Team च्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांना आपल्या क्वॉर्टर्समध्ये बोलावून घेतले.

खूप तपास केल्यावर MIT च्या अधिकाऱ्यांच्या हाती काहीच लागले नाही; म्हणून त्यांनी ही केस MDA म्हणजेच Mars Detective Agency कडे सोपवली. MDA चे अध्यक्ष पीटर कुक यांनी ही केस स्वीकारली व आपल्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली.

प्रोफेसर या घटनेमुळे फार दु:खी झाले होते. कारण मॅग्ना हा त्यांच्या मित्राप्रमाणे होता. प्रोफेसर त्याला आपल्या प्रत्येक गोष्टी सांगत होते. त्याला प्रोफेसरांच्या सर्व वैयक्तिक गोष्टी व संशोधनाबद्दल माहिती होती.

प्रोफेसरांच्या क्वॉर्टर्सची कसून झडती घेतल्यावर पीटर कुकच्या हाती या केसमधील महत्त्वाचा धागा सापडला. तो एका रोबोचा साईनबोर्ड होता. ज्याप्रमाणे दोन सारख्या गाड्या ओळखण्यासाठी नंबरप्लेट असते त्याचप्रमाणे रोबो ओळखण्यासाठी साईन बोर्डचा वापर करतात. त्यानंतर पीटरनं



मंगळावरील सर्व रोबोंची रजिस्टरे चाळून काढली. तेव्हा त्याला अशी माहिती मिळाली, की या कोडचा रोबोच मंगळावर अस्तित्वात नाही. संपूर्ण समितीवर या केसचा दबाव वाढत चालला होता.

एकदा प्रोफेसरांशी रोबोच्या आंतररचनेविषयी बोलताना पीटरच्या डोक्यात वीज चमकली. प्रोफेसरांनी त्याला सांगितले, की रोबोचा साईनकोड रोबोच्या प्रोसेसरवर कोरलेला असतो. पीटरनं त्वरित प्रोफेसरांच्या क्वॉर्टरमधील सर्व रोबोंना संशोधन खोलीत बोलावले. त्याने सर्व रोबोंची झडती घ्यायला सुरुवात केली. त्यापैकी 'जोजो' नावाच्या रोबोचा तो साईन बोर्ड होता. पीटरनं त्याला प्रश्न विचारायला सुरुवात केल्यावर असे कळले, की तो 'असूरस्तान'




कधी दादू येता, पसारा घनांचा। कसा सावळा रंग, होतो मनाचा।।

**जरूर शोधा**... www.indiapost.gov.in.(वेगवेगळ्या तिकिटांचे फोटो व त्यांचा इतिहास)



प्रायोजक – कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे.



या देशातील रोबो होता. त्यांचा लष्करप्रमुख 'जोजो'ला नियंत्रित करत होता. ही माहिती देताच 'जोजो' मधून विचित्र आवाज येऊ लागले व जोजोचे तुकडे-तुकडे झाले.

आता सर्व गोष्टी पीटरच्या लक्षात यायला लागल्या होत्या. त्याने त्वरित अंतराळयाने सज्ज करण्याचा इशारा दिला. सर्व तयारी करून तो स्वत: उडत्या तबकडीतून पृथ्वीकडे निघाला. सोबत त्याने काही कमांडोज्ची तुकडी घेतली.

त्याने 'असूरस्ताना'च्या राष्ट्राध्यक्ष व लष्करप्रमुखांना ताब्यात घेतले. कसून चौकशी केल्यावर पीटरला त्यांच्याकडून धक्कादायक माहिती मिळाली. लष्करप्रमुख संगणकतज्ज्ञ म्हणजेच सायबर एक्सपर्ट होता. मंगळावर त्यांना आपले वर्चस्व गाजवायचे होते. तेथील शास्त्रज्ञ त्यांना ताब्यात घ्यायचे होते. त्यांच्या संशोधनाचा गैरवापर करावयाचा होता. त्याने मंगळावरील वस्ती नष्ट करण्यासाठी प्लॅन बनवला; पण 'मॅग्ना'ची मेमरी 'जोजो'च्या मदतीने बदलताना गडबड झाली. 'मॅग्ना'चा ब्लास्ट झाला. घाईने पळून जाताना 'जोजो'चा साईनबोर्डही खाली पडला. नंतर जेव्हा 'जोजो'ने पीटरला माहिती देण्याचा प्रयत्न केला तेव्हा




लष्करप्रमुखाने त्याची माहिती डीलीट करण्याचा प्रयत्न केला; तेव्हा 'जोजो'चाही ब्लास्ट झाला.

वरील खुलाशानंतर व ठोस पुराव्यानंतर आंतरराष्ट्रीय न्यायालयाने लष्करप्रमुख आणि राष्ट्राध्यक्ष यांना आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली.पीटरचे मंगळावर जल्लोषात स्वागत झाले आणि त्याला 'मंगळावरील महामानव' हा किताब बहाल केला.

❋❋❋

**– चि. अद्वैत थत्ते (इ. ८वी)**
कादवण, ता. मंडणगड, जि.रत्नागिरी
***चित्रकार*** *– कु. रेवती पाटील, अवंती पोरे*

---

## ...हास्यतरंग...







**चित्रकार – कु. इरावती आनंद**



आकाशाच्या गूढ नीलिमा, अर्धोन्मीलित नयनादेखत। घटिकेमागून घटिका जावी, स्वप्नांच्या मधुशाला रेखत।।



**जरूर शोधा...** www.orientalbirdimages.org. (पक्ष्यांचे फोटो व माहिती)

प्रायोजक – श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.) पुणे ☎ २५३८०४०६

# अस्तित्व



सायंकाळची वेळ. खिडकीतून मी आकाशाकडे डोकावून बघितलं. आकाश अभ्राच्छादित होतं. काळ्या ढगांनी त्याला पुरतं व्यापून टाकलं होतं. मधेच वाऱ्याची झुळूक यायची, झाडावरची छोटी पानं हलायची. ढगांचा रंग काही ठिकाणी गडद काळा अन् काही ठिकाणी विरळ काळा भासत होता. पश्चिमेकडे सूर्य अस्ताला चालला होता. ढगांच्या काळ्या पडद्यातून तो डोकावत होता.

काही वेळ असाच गेला... खिडकीवरील छतावर एका थेंबाचा टपकन् आवाज आला. धरतीवर आलेला आजचा पहिला थेंब कोणता असेल? हा एक प्रश्न मनाला स्पर्शून गेला. हळूहळू करत इतर थेंबही खाली यायला लागले आणि मातीचा सुखद सुगंध मी मनात साठवून ठेवला.

पटपट थेंब खाली आले. ढगांवरून उडी मारत त्यातले बरेच थेंब मातीत मिसळले. स्वत:चं अस्तित्व गमावून बसले. काही थेंबांनी सिमेंटच्या रस्त्यावर नक्षी तयार केली. काही थेंब छतावर पडले. उतारावरून घरंगळत गेले. आकाशातून जमिनीकडे थेंब धावत होते. एक थेंब कडुनिंबाच्या पानावर पडला. काही क्षण तो तिथेच होता. नंतर वाऱ्याच्या झुळूकीने डहाळी हलली, नि क्षणार्धात तो थेंब तिथून नाहीसा झाला. माळेतून मोती पडावे तसे थेंब धरणीला बिलगत होते.

हळूहळू पावसाचा वेग वाढत होता. रात्र चढत होती. त्या काळोखातही काही थेंबांनी, त्या रंगहीन थेंबांनी आपले अस्तित्व निर्माण केले होते. थेंबांची मोठी रीघ बनून तिची सर झाली होती.

सिमेंटच्या रस्त्यावरची नक्षी क्षणार्धात नाहीशी होत होती. रस्त्यावर भरधाव वाहन गेल्यावर तुषार तेवढे उडत होते. बिंदू बनून कडुनिंबाच्या पानाला सजवणारा थेंब कुठेच नव्हता. ते पान न्हाऊन निघाले होते. आता पावसाचा जोर वाढला नि रस्त्यावरची वाहतूक मंदावली.

रस्त्याच्या कडेला तलाव तयार झाला होता. बरेच थेंब ढगातून येऊन त्या तळ्याशी एकरूप झाले, त्यांचे अस्तित्वच उरले नाही. काही थेंबांनी प्राण्यांना ओले केले.

एक निश्चियी थेंब झरझर खाली येत होता. हळूहळू मनाशीच हसत इतर थेंबांपेक्षा वेगळं काही करण्याची ऊर्मी त्याच्या मनात दाटली होती. काळोखात तो चाचपडत होता. तो तळ्यात वलय निर्माण करणार होता का पानांवर मोती बनणार होता? नाही. त्याला काहीतरी वेगळं करायचं होतं. थेंबाला वाटलं, आपण शिंपल्यात शिरून मोती बनावं, आपलं वेगळं अस्तित्व निर्माण करावं.

तेवढ्यात, छताखाली बसलेल्या वेड्या चातकाला त्यानं बघितलं. भांबावलेला, घाबरलेला तो पक्षी छताखाली चोच उघडून बसला होता. हे पाहून मोती बनण्याच्या स्वार्थी विचाराला त्या थेंबाने झुगारलं. चातकाच्या चोचीच्या दिशेने तो थेंब धावला तो आपल्या मागोमाग येणारी सर घेऊनच! चातकाला पाणी पाजून त्यानं आज तृष्णातृप्तीचं समाधान मिळवलं. ही गोष्ट मात्र कुणाच्याच लक्षात आली नाही...!

❋❋❋

**कु. अवनी खोडकुंभे** (इ. ९ वी)
१०३, कृष्णा हाईटस्,
जठारपेठ चौक, अकोला
***चित्रकार :*** *चि. साकेत वेल्हाळ, कराड*




पाऊस सोहळा झाला, कोसळत्या आठवणींचा। कधी उधाणता अन् केव्हा, थेंबांच्या संथ लयीचा।।

**जरूर शोधा...** www.birdwatching.com (पक्षीनिरीक्षणाच्या ठिकाणांविषयी, पक्ष्यांविषयी)

**प्रायोजक – श्री. चिंतामणी बने, डोंबिवली.**




# ऋतू



सरूनि शिशिर आता, पार आला **वसंत।**
झडुनि मलिन पाने, भंगलीही अनंत।।
नविन वस्त्रे, वेशभूषा नवीही।
नटलि थटलि पृथ्वी, मंत्रमुग्ध सभा ही।।
विरुनि हरित कांती, पर्व आले नवे हे।
गरम गरम उष्ण, शुष्क वारे हि वाहे।।१।।

हळुहळू तर हाले, दृश्य चित्रातले ते।
बदलूनि ऋतू आता, **ग्रीष्म** आला घराते।।
कडक तरल आले, ऊन तापे धरित्री।
खग हि जलद घेती, त्या आकाशी भरारी।।
गीरीशिखरही झाले, ओस आता पुन्हा हे।
सुकुनि जलही सारे, शुष्क झाले झरे हे ।।२।।

जलद जलद आले, थेंब मोठे टपोरे।
ऋतू बदलत **वर्षा**, खूश ती सर्व पोरे।।
झटपट पट येती, सान मोठे अवारी।
भिजुनि सकल काया पूर्ण घेती भरारी।।
सरसर सर वृष्टी, त्यात वारा भरारा।
भरभर भर उडुनीया, पक्षी शोधे निवारा ।।३।।

हळूच वरून येती थेंब पाणी तयात।
जलद **शरद** आला, येथ गर्वात गात।।
किसन, नयनि त्याच्या सौख्य सारे दिसावे।
सुखद समयी ह्या त्या, गाव सारे हसावे।।
कधितरि गृह सारे, पाणियाने भरावे।
किडूक मिडूक काही, फक्त मागे उरावे।।४।।

जवळ जवळ सारे, चित्र रंगूनी जावे।
धवल तरल **हेमंता**, धारेपाशीही धावे
झरझर झर वरूनिया, थंड वाराही आला।
नरम नरम वस्त्रे, लागताती तयाला
हळूहळू कुणी नाही, दार सोडून गेले।
हसत हसत सारे, ग्राम बाहेर आले।।५।।

कुडकुडतही सारे, पार आनंदले हो।
**शिशिर** जवळ आला, सर्व सौख्यात राहो।।
हिमशिखरही झाले, गच्च आता पुन्हा हे।
तरल हिमही येई, गार पृथ्वीवरी हे।।
सरूनी सकल चक्रे, मासही संपले हे।
ऋतू शिशिरही गेला, चक्र झाले सुरू हे।।६।।

– **कु. मुक्ता हळबे,** २, संकेत अपार्टमेंट, २६ प्रशांत सोसायटी, कोथरुड, पुणे ३८

***चित्रकार :*** *कु. अनुष्का जोशी*



**डोंगराच्या मायेसाठी, रूप वाफेचे घेऊन। नदी तरंगत जाते, पंख्र वाऱ्याचे लावून।।**



**जरूर शोधा...** www.origami-resource-center.com/easy-origami (ओरिगामी सोप्या पद्धतीने कशी करावी)

दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा. **प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे.**

# संवाद एका उद्योजकाशी



श्री. श्रीकांत पडगिलवार

प्रसन्न, प्रभावी व्यक्तिमत्त्व, शेतकऱ्यांसाठी झटणारे, सतत कार्यमग्न असणारे, जुनी-नवी पिढी यांचा समन्वय साधण्यासाठी नवनवीन ज्ञान घेऊन, याही वयात अभ्यासूवृत्ती जोपासणारे असे श्रीकांत सर! समाजाप्रती आस्था बाळगणारे, अकोल्यातील सुप्रसिद्ध उद्योजक, 'पडगिलवार इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड' चे संचालक
श्री. श्रीकांत पडगिलवार यांची मुलाखत घेण्याचा अपूर्व योग आम्हाला आला. शेतकऱ्यांचे कष्ट कमी करण्यासाठी तसेच त्यांना शेतीच्या कामात उपयुक्त ठरतील अशा यंत्रांची निर्मिती करण्यात पडगिलवार इंडस्ट्रीज अग्रेसर आहे. मुलाखती दरम्यान श्री. श्रीकांत पडगिलवार यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एकेक पैलू उलगडत गेले.

आपल्यापर्यंतही त्यांचे विचार पोहोचावेत हाच या मुलाखतीचा उद्‌देश. सोमवारी आम्ही ठरलेल्या वेळेनुसार सकाळी ९.३० वाजता श्री. पडगिलवार यांच्या घरी मुलाखतीस गेलो. गेल्याबरोबरच श्री. पडगिलवारांनी हसतमुखाने आमचे स्वागत केले आणि अगदी खेळीमेळीच्या वातावरणात सहजगत्या आमच्या कुतुहलपूर्ण प्रश्नांचे त्यांनी समाधान केले.

**मुलाखतकार –**

**कु. गुंजन मोहोकार, कु. गौरी वंजारे, कु. साक्षी नानोटे, कु. शिवानी मसने**

- **सगळ्यांसाठी बालपण, शालेय महाविद्यालयीन जीवन हा एक अमूल्य ठेवा असतो. आम्हाला आपल्या शालेय व महाविद्यालयीन जीवनातील अनुभव ऐकायला निश्चितच आवडतील.**

माझा जन्म अकोल्यामधील दिग्रस येथे इ. स. १९५८ साली झाला. घरची परिस्थिती सर्वसाधारण होती. घरी शेती होती. वडील व्यवसायाच्या निमित्ताने अकोल्यात स्थायिक झाले. देवराव बाबाच्या चाळीत हसतखेळत बालपण गेले. शिक्षणाची गोडी असल्यामुळे एकाच वर्षात दुसरी–तिसरी इयत्ता उत्तीर्ण होऊन मी वरच्या वर्गात प्रवेश केला आणि शिक्षणाची घोडदौड वेगाने सुरू झाली. अकोल्यात पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यावर उच्चशिक्षणासाठी मी कर्नाटकातील मणिपाल येथील महाविद्यालयात प्रवेश घेतला. भारतीय माणसांचा कोणत्याही परिस्थितीशी जुळवून घेण्याचा स्वभाव असल्याने, तेथे शिकण्यासाठी आलेल्या विविध प्रांतीय विद्यार्थ्यांशी माझी मैत्री झाली. आम्ही सर्वांनी तेथील भाषेशी जुळवून घेतले. अकोला ते कर्नाटक ४८ तासांचा प्रवास तोही आनंदाने स्वीकारला. इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त केल्यानंतर अमेरिकेतील एका प्रतिष्ठित महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. त्यावेळेस तेथील शिष्यवृत्तीसाठी एक परीक्षा द्यावी लागायची. दुर्दैवाने खूप प्रयत्न करूनही मला ती शिष्यवृत्ती मिळू शकली नाही. तेव्हा माझ्या घरची परिस्थिती तेथील प्राध्यापकांना सांगितली. माझी शिकण्याची जिद्द बघून विद्यापीठात आठवड्यातून १२ तास काम करून, अभ्यासातील प्रगती कमी न होऊ देण्याचे आश्वासन माझ्याकडून घेतले. मगच मला ती शिष्यवृत्ती दिली गेली. अशाप्रकारे मी काम करत करत माझे शिक्षण पूर्ण केले. म्हणूनच मला असे वाटते, की आयुष्यातील हा काळ म्हणजे सुवर्णकाळ असतो. हा आपल्या घडणीचा काळ असतो. या काळातील आठवणी सदैव आपल्याबरोबर असतात.

- **आपण हाच व्यवसाय सुरू करावा असं का वाटलं? किती वर्षांपासून या व्यवसायात कार्यरत आहात?**

माझे वडील धान्याचे व्यापारी असल्यामुळे शेतकरी व त्याला येणाऱ्या अडचणी माझ्या वडिलांमुळे मलाही माहीत झाल्या होत्या. 'शेतकऱ्यांचे कष्ट पाहून मी त्यांचे श्रम कमी करण्यासाठी नक्कीच प्रयत्न करेन,' असं मनोमन ठरवलं व पदवी प्राप्त केल्यानंतर



पुन्हा होऊन लेकरू, नदी वाजविते वाळा। पान्हा फुटतो डोंगरा, आणि येतो पावसाळा।।

**जरूर शोधा...** www.origami-make.com (ओरिगामीची छायाचित्रे, माहिती, कृती)

प्रायोजक – आय. टी. डी. सिमेंटेशन इंडिया, सातारा.






शेतकऱ्यांसाठी यंत्र निर्मिती करण्याच्या दिशेनं वाटचाल सुरू केली.

- **आपण आपल्या व्यवसायात उत्तम प्रगती केली या यशाचं रहस्य ऐकायला आम्हाला निश्चितच आवडेल.**

हा व्यवसाय सुरू करण्याचं मुख्य उद्दिष्ट होतं शेतकऱ्यांचे कष्ट कमी करणं. आम्ही कृषिक्षेत्राशी निगडित **डस्ट कलेक्शन सिस्टिम, थ्रशर इ. सारखे ३०–४० प्रकार विकसित** केले. शेतकऱ्यांना फवारणीसाठी २० किलो वजनाचे यंत्र पाठीवर घ्यावे लागे. आम्ही त्याचे तंत्र विकसित करून बैलाच्या साहाय्याने चालणारे **फवारणी यंत्र** बनवले. यंत्राच्या किंमतीही किफायतशीर ठेवल्या. शेतकऱ्याची कामं सुलभ व्हावी हा निश्चित उद्देश डोळ्यांसमोर होता.

- **आपल्या आयुष्यात आपले प्रेरणास्थान म्हणून तुम्ही कोणाला आदर्श मानता?**

अर्थातच माझे वडील. त्यांच्याकडून मला वेळोवेळी प्रोत्साहन, आधार मिळाला. संकटाच्या वेळी ते सदैव माझ्या पाठीशी उभे राहिले.

- **व्यवसायातील पूर्वस्थिती व सद्यस्थिती याबद्दल आपले मत जाणून घेण्यास आम्ही निश्चितच उत्सुक आहोत.**

व्यवसायातील पूर्वस्थिती व सद्यस्थितीत खूप बदल आहे. नवे तंत्रज्ञान विकसित होत असताना निश्चितच व्यवसायातही प्रगती झाली आहे; परंतु पूर्वीचा प्रामाणिकपणा आणि व्यवहारातील पारदर्शकता आज लोप पावत आहे. भारताचा कणा असलेला शेतकरी आज भ्रष्टाचारामुळे लुबाडला जात आहे. त्यांची ही परिस्थिती पाहून खंत वाटते.

- **ग्राहकांचे लक्ष वेधण्यासाठी कोणत्या पद्धतीचा अवलंब करता?**

ग्राहकवर्गाला अर्थातच शेतकऱ्यांना आकर्षित करण्यासाठी त्यांच्या गरजा अगदी नेटक्या पद्धतीने पूर्ण होणे गरजेचे आहे. माझ्या मते प्रत्यक्ष त्यांच्याशी संवाद घडवूनच हे शक्य होईल. त्यासाठी कृषिप्रदर्शन, मेळावे इ. ठिकाणी जाऊन तेथील ग्राहकवर्गाच्या समस्या जाणून घेऊन, त्या सोडवण्याचा मी प्रयत्न करत असतो. यातूनच ग्राहकवाढ होते व पर्यायाने नफाही वाढतो.

- **आपली वार्षिक उलाढाल किती आहे? परदेशातही आपला व्यापार आहे, त्याबद्दल आम्ही जाणून घेण्यास उत्सुक आहोत.**

आमची वार्षिक उलाढाल ३० कोटींपर्यंत आहे. पडगिलवार इंडस्ट्रीजची यंत्रे प्रामुख्याने दक्षिण आफ्रिकेला पाठविली जातात. या शिवाय आग्नेय आशियातही निर्यात केली जाते. इतर ४०–४५ प्रगत देशांबरोबर आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकून राहणे, हे खुलं आव्हान स्वीकारण्यासारखं आहे. हिंमत, जिद्द यांच्या जोडीने आणि आधुनिक विचार स्वीकारण्याची मनोवृत्ती ठेवून प्रगती करणे, असा आमचा प्रयत्न नेहमीच राहील.

- **आपल्या कारखान्यातील कामगारवर्गाबद्दल आपल्याला आस्था आहे. त्याच्याबद्दल आपले मत आम्ही जाणू इच्छितो.**

MIDC येथे आमचे एकूण ४ कारखाने आहेत, त्यात ३००–३५० कामगार आहे. कामगारांसाठी प्रोव्हिडंट फंडमध्ये कंपनी काही भागाचे योगदान देते तसेच कामगारांच्या आरोग्याबाबतही आम्ही जागरुक आहोत.



आलं भरून आभाळ, कृष्ण मेघ झाले गोळा, आली आली पाणकळा।।



**जरूर शोधा...** www.pinterest.com/elenatgeezer/paper-quilling (पेपर क्विलिंगची माहिती, छायाचित्रे, कृती)

**प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.**



धान्याची स्वच्छता करण्यासाठी

**पुष्पक ग्रेटर**

त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी काही योजना आहेत.

**• कामातील व्यापामुळे आपल्याला आपले छंद जोपासता येतात का?**

कामाच्या वेळी काम आणि इतर वेळी मी माझा छंद जोपासायला आवर्जून वेळ देतो. वाचन करणे, आरोग्यविषयक उपक्रम करणे हे माझे छंद. प्राणायाम, योगासन करणे हे मी नित्य नेमाने करतो.

- **आपण कोणकोणत्या सामाजिक संस्थांशी संबंधित आहात?**

रोटरी क्लबच्या संचालक मंडळात मी सदस्य म्हणून कार्यरत आहे. तसेच जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून बघण्याचा विचार विकसित करणाऱ्या 'आर्ट ऑफ लिव्हिंग'शी संलग्न आहे. याशिवाय अकोला अर्बन को. बँकेत संचालक मंडळातही मी कार्यरत आहे.

- **आपल्याला व्यवसायात आलेला अविस्मरणीय अनुभव कोणता आहे?**

दरवर्षी भारत सरकारतर्फे विशेष संशोधन करणाऱ्याला पंतप्रधानांतर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी आमच्या कंपनीची निवड झाली. हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय अनुभव आहे.

**• आतापर्यंत आपल्याला कोणकोणत्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले?**

मला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या समांतर असा महाराष्ट्र शासनाच्या 'एक्स्पोर्ट अ‍ॅवॉर्ड'ने गौरविण्यात आले आहे. तसेच 'उद्योगश्री' हा पुरस्कारही मला मिळाला आहे.



धान्याची प्रतवारी करण्यासाठी

**पुष्पक ग्रॅव्हिटी सेपरेटर**

- **एक यशस्वी उद्योजक म्हणून तुम्ही आम्हा तरुण पिढीला काय संदेश द्याल?**

तरुणांनी नोकरी करण्यापेक्षा छोट्या-मोठ्या व्यवसायाचा विचार करावा. स्वप्न पाहा, ध्येय ठरवा, जबर इच्छाशक्ती कायम ठेवा. अपयशांमुळे न खचता पुढे जात राहा. जगातल्या चालू घडामोडींचा आढावा घ्या आणि आयुष्यभर विद्यार्थी म्हणूनच राहा आणि नवीन काही शिकण्याची उमेद बाळगा.''

❋❋❋

- **कु. गुंजन मोहोकार, कु. गौरी वंजारे, कु. साक्षी नानोटे, कु. शिवानी मसने**
(इ. ९वी व१०वी)
बालशिवाजी माध्यमिक शाळा, जठारपेठ , अकोला

## आगळी – वेगळी गुरुपौर्णिमा

'गुरुपौर्णिमेच्या' दिवशी आपल्याला आपल्या शिक्षकांची प्रकर्षाने आठवण होते, हो नं? पण फक्त वर्षभरातून एका दिवसापुरतीच होते का? विचार करा बरं. शिक्षकच नाही तर प्रत्येकच व्यक्ती, प्राणीमात्रांकडून, निसर्गाकडून काहीना काही कळत-नकळत आपण शिकत असतोच. त्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा ! ही गुरुपौर्णिमा नेहमीपेक्षा आगळ्या-वेगळ्या पद्धतीने तुम्ही साजरी करत असाल. किंवा यंदा ती नावीन्यपूर्ण पद्धतीने साजरी करावी, असं ठरवलंही असेल. **गुरूपौर्णिमा साजरी करण्याच्या तुम्हाला सुचलेल्या व तुम्ही प्रत्यक्ष करून पाहिलेल्या अभिनव कल्पना 'छात्र प्रबोधन'कडे २० जुलैपर्यंत इ-मेल किंवा पत्राद्वारे पाठवा.** तुमच्या अभिनव कल्पनांसाठी 'छात्र प्रबोधन' तर्फे तुम्हाला खास बक्षीस!! पत्रावर नाव, पत्ता, इयत्ता, दूरभाष क्रमांक घालायला विसरू नका.



तू नभा, पर्जन्यधारा वर्षिल्या आनंदुनी । दिव्य आशीर्वाद लाभे, तृप्तीच्या या जीवनी ।।

**जरूर शोधा...** www.marathikavita.co.in. (विविध कवींच्या कवितांचे संकलन)

**प्रायोजक – सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे.**




आजपर्यंत चित्रकलेत अगणित प्रकार विकसित झाले आहे. अनेक ठिकाणी त्यांचा वापरही झाला आहे. विविध पद्धतीचे रंग, त्यांच्या छटा, वेगवेगळी माध्यमं या सर्वांचा वापर झालेला आहे. त्यात नवीन काय शोधावं? असा विचार करत असतानाच कॉफी पेंटींगची कल्पना सुचली. कॉफी पावडर वापरून कागदावर वेगळा परिणाम साधता येईल का? असा विचार मनात आला. म्हटलं , निदान प्रयोग करायला काय हरकत आहे? फार फार तर काय होईल? तर प्रयोग यशस्वी नाही होणार. 'पण प्रयत्न करून पाहायलाच हवा', या विचाराने मी घरात असलेल्या सामानाची जमवाजमव केली आणि तयारी सुरू केली.कॉफी पेंटिंगसाठी मी पुढीलप्रमाणे कृती केली.

**साहित्य :** साधा ड्रॉइंग पेपर, कॉफी पावडर, पाणी, विविध प्रकारचे ब्रश, पेन्सिल, सजावटीसाठी आवडीचे सामान, ग्लिटर ट्यूब.

**कृती :** अगोदर ड्राईंग पेपरची खरखरीत बाजू वर केली. त्यावर पेन्सिलने वरील स्केच काढून घेतले. त्यानंतर कॉफी पावडरमध्ये थोडेसे पाणी घालून घट्ट मिश्रण तयार करून घेतले. ज्यामुळे गडद रंग मिळाला आणि मग त्या रंगाने, कमी नंबरच्या ब्रशने संपूर्ण स्केचला आऊटलाईन काढून घेतली. फिकट रंग




मिळवण्यासाठी आणखी पाणी घालून पातळ मिश्रण तयार केले. आऊटलाईन संपूर्ण वाळल्यावर फुलांच्या पाकळ्या, देठ, पाने यांना पाण्याचे कॉफी पावडरमधील प्रमाण कमी जास्त करून रंगवून घेतले. पाकळ्यांना सर्वांत फिकट छटा, पानांना थोडी गडद तर देठाला आणखी गडद छटा वापरली. अगोदर मी आऊटलाइन केली नव्हती. पण चित्र पूर्ण झाल्यावर मला हवा तसा परिणाम दिसत नव्हता. त्यामुळे मी आऊटलाइन करून पाहिली आणि व्यवस्थित दिसण्यासाठी आऊटलाइन सगळ्यात गडद रंगात रंगवून घेतली. सजावटीसाठी ग्लिटर ट्यूबच्या साहाय्याने पाकळ्या आणि पानांवर चंदेरी रंगाची डिझाईन केली.

तर अशाप्रकारे माझे कॉफी पेंटींग पूर्ण झाले. तुम्ही वेगवेगळ्या चित्रांवर कॉफी पेंटींग करून त्या चित्रांची सुंदरता वाढवू शकता. त्यावर थोडीशी पूरक सजावट करून तुम्ही त्याचा आवश्यक तो परिणाम साधू शकता. कॉफी पेंटींगला अधिक उठाव येण्यासाठी मी ग्लिटर वापरला; पण तुम्ही त्या सजावटीऐवजी आणखी काही तुमच्या कल्पना वापरू शकता. ग्लिटर ट्यूब ऐवजी विविध मणी, बटन्स, कागदाचे तुकडे, सजावटीच्या इतर गोष्टी वापरून पाहा. फक्त कॉफी पेंटींगचं नाही, तर इतर कोणत्या पदार्थांपासून आपण चित्र काढू शकतो का, हे तपासून पाहा. कोणत्या गोष्टींमुळे चित्रांमध्ये कसा परिणाम दिसतो, त्यावरून कदाचित एखादी नवी शैलीही तुम्हाला विकसित करता येईल. आपली कल्पनाशक्ती वापरून चित्रकलेत नवीन संकल्पना आपण वापरू शकतो. तर मग चला लागा कामाला!

❋❋❋

**– कु. प्रतिमा मेंढे** (इ. १० वी)
बाल शिवाजी माध्यमिक शाळा, जठारपेठ अकोला
**शब्दांकन :** कु. अवंती पोरे



दगा देऊन ऋतू जातात, इमान राखतात मातीशी। माथ्यावरती विजा झेलीत, नाते सांगतात पावसाशी।।



**जरूर शोधा...** photography.nationalgeographic.co.in/photography (छायाचित्रणाचे तंत्रज्ञान, माहिती)

प्रायोजक – डॉ. संतोष काकडे, बंगळुरू.

# थरार स्कूबा डायव्हिंगचा !

– चि. रुचिर कुलकर्णी



यंदा माझं दहावीचं वर्ष! त्यामुळे दहावीची शाळा लवकरच सुरू होणार होती. 'नववीची ही छोटीशी सुट्टी आठवणीत राहिली पाहिजे, असं काहीतरी करूया' असं सारखं वाटत होतं. पण काय? ते काही सुचत नव्हतं... तेवढ्यात आई-बाबांनी सुट्टीत 'डेस्टीनेशन गोवा...' जाहीर केलं आणि लगेचच मला एक कल्पना सुचली. बाबांनीही त्या कल्पनेला प्रोत्साहन आणि पाठिंबा दिला.

ZNMD अर्थात 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' हा चित्रपट पाहताना मला स्कूबा डायव्हींगविषयी उत्सुकता वाटू लागली होती. एरवी 'नॅशनल जिऑग्राफिक' चॅनेल वर स्कूबा डायव्हींग करून समुद्राचा तळ गाठणाऱ्या आणि तेथील जैवविविधतेवर संशोधन करणाऱ्या मंडळींविषयी अभिमान वाटत होताच! गोव्याला जातोय तर स्कूबा डायव्हींगची संधी आपण सोडायची नाही असं 'आम्ही' ठरवलं. हो, आता माझ्याबरोबर माझे बाबा देखील 'स्कूबा' चा थरार अनुभवणार होते. अगदी त्यांना पोहता येत नसून सुद्धा!! पुण्यात असतानाच तेथील 'स्कूबा डायव्हिंग स्कूल' ची माहिती आम्ही घेतली. तिथल्या मार्गदर्शकांशी बोलणे झाले. स्कूबा डायव्हींगचा दिवस निश्चित केला.

याआधी गोव्याच्या निसर्गानं, समुद्रानं, नागमोडी लाल रस्त्यानं, देवळांनी आणि चर्चेस्नी गोव्याचा नितांत सुंदर असा ठसा मनावर उमटवला होता. यावेळच्या सहलीत 'स्कूबा'द्वारे गोव्याच्या समुद्राचं अंतरंग व 'पॅरासेलिंग' करून समुद्रावरच्या आकाशाची भव्यता अनुभवण्याचा छोटासा प्रयत्न करणार होतो.

गोव्यात पाऊल ठेवल्याबरोबर वेध लागले होते ते स्कूबा डायव्हिंगचे! डाईव्ह करण्याच्या एक दिवस आधी, आमचं एका तलावात एक दिवसाचं प्रशिक्षण शिबिर घेण्यात आलं. तिथे आम्हाला समुद्रात घालायचा 'वेट सुट' दिला. तो घालून आम्ही तलावात उतरलो. हे सत्र आमच्यासाठी फारच महत्त्वाचं होतं. तो वेट सुट कसा घालायचा? पाठीवर ऑक्सिजन सिलेंडर कसा वागवायचा? तोंडात रेग्युलेटर असताना श्वास कसा घ्यायचा? कानात दडे बसले तर काय करायचं? तोंडातून रेग्यूलेटर सुटला तर तो पाण्यात कसा शोधायचा? आपल्या पायाला बदकाच्या पायासारखे असणारे 'फिन्स' लावून पाण्यात कसं चालायचं? इ. गोष्टी शिकवण्यात आल्या. शिवाय पाण्यात असताना 'स्कूबा' च्या मार्गदर्शकांना करायच्या ok / not ok च्या खुणा कशा असणार होत्या, त्याचंही प्रात्यक्षिक झालं.

अखेर तो दिवस उजाडला. आम्हाला आमच्या डाईव्ह इन्स्ट्रक्टरनं (मार्गदर्शकानं) सकाळी सात वाजता कलंगुट भागातील तलावावर बोलावलं. तिथून एका सतरा आसनी गाडीनं आम्ही सर्वजण ॲग्वादा परिसरातल्या 'सेक्वीरियम जेट्टी 'वर पोहोचलो. आमच्याबरोबर आणखी दहा जण डायव्हींग करणार होते. आमच्या सोबत चार मार्गदर्शक व ज्यांना 'डायव्हिंग स्पॉट' पर्यंतचा प्रवास अनुभवायचाय अशी २ ते ३ लोकं होती. त्यात माझी आईपण होती. डायव्हींग स्पॉट पर्यंत बोटीनं जायला आम्हाला दोन-सव्वा दोन तास लागणार होते. आमची डाईव्ह बोट छोटी होती. डायव्हिंग स्पॉट वर जाताना आम्हाला गोव्याच्या समुद्राचं सुंदर दर्शन झालं. बोटीने जाताना दिसणारा गोवा विमानतळ, मेयरर्स रेसिडेंट, गोवा सेन्ट्रल जेल इ. भागांची माहिती मार्गदर्शक आम्हाला करून देत होते. मीरामार बीच, डोनापौला इ. माहितीची ठिकाणंही कधीच मागे पडली. आता फक्त दूरपर्यंत समुद्र, आमच्या बोटीवर फुटणाऱ्या लाटा आणि मनामध्ये चाललेली चलबिचल एवढंच जाणवत होतं. जसा स्पॉट जवळ येत होता, तसं



गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले । शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले ।।

**जरूर शोधा...** www.betterphoto.com (छायाचित्रणाविषयी माहिती)



**प्रायोजक – श्री. सुधीर विष्णू दफ्तरदार, पुणे**



पाण्याखालील जीवसृष्टी

तसं मला भीतीने घेरलं. अथांग समुद्राची भीती वाटू लागली. खोलीचा अंदाज असलेल्या तलावात डुबकी मारणं वेगळं अन् या अथांग समुद्रात उडी मारणं वेगळं ! 'रहित करू डाईव्ह मारणं!' असा देखील एक विचार मनात चमकला. ढगाळ वातावरण असल्यामुळे समुद्र थोडा खवळलेला होता. लाटासुद्धा मोठ्या येत होत्या. लाटांचं पाणी बोटीत पडत होतं. बाबांकडे पाहिलं तर ते शांत होते. मला खुणेनंच शांत राहण्याविषयी त्यांनी सांगितलं. आईनंही मला डायव्हिंग करायला प्रोत्साहन दिलं; (अर्थात कुठल्याही क्षणी मला 'घुमजाव' करण्याची संधी होतीच!) मीपण मनाचा हिय्या केला.

बघता बघता एका खडकाळ बेटाजवळ आमची बोट थांबली. त्या ठिकाणी समुद्र थोडा शांत होता. त्या बेटावर नुसती झाडी होती. तिथे बोटीतून उतरायची सोय नव्हती; पण बोट 'अँकर' केली गेली. तिथे पोहोचल्यानंतर पंधरा मिनिटं 'डाईव्ह' साठी तयार होण्यात गेली. पायात 'फिन्स', अंगात वेट सूट, कमरेला वजनाचा पट्टा, पाठीवर ऑक्सिजन सिलेंडर व तोंडात रेग्यूलेटर असा 'जामानिमा' करून बोटीच्या काठावर बसून आम्ही समुद्रात उलटी उडी (पाठीवर उडी) टाकली. अँकर केलेल्या बोटीच्या दोराला पकडून आम्ही हळूहळू पाण्याखाली जायला लागलो. खाली जाताना आम्हाला काहीही दिसत नव्हतं. आम्ही खाली जात होतो, तसा सूर्यप्रकाश कमी कमी होत होता. पाण्याखाली बारा मीटर खोल गेल्यावर बोटीच्या अँकरचा दोर आम्ही सोडला. मी व बाबा स्वतंत्रपणे पोहू लागलो. आमच्याबरोबर आमचे मार्गदर्शक होते. आम्ही अधिक खाली गेल्यावर आमच्यासमोर छोट्या माशांची एक 'टोळी' आली. ती आमच्या अवतीभोवती फिरू लागली. आम्ही त्यांच्या प्रदेशात अतिक्रमण केले होते नं ! मार्गदर्शकांनी बरोबर आणलेलं माशांचं खाद्य घातल्यावर ती टोळी त्यावर तुटून पडली. आम्ही थोडं पुढे जाताच कोरलचा एक मोठा खडक लागला.



झिम्मड पावसाची

त्याच्याजवळ आणि त्या छिद्रांमध्येही रंगीबेरंगी, वेगवेगळ्या आकाराचे भरपूर मासे दिसले. तिथे वेगवेगळ्या पाणवनस्पती बघितल्या, वेगवेगळी शैवाल, शंख शिंपले यांनी समृद्ध असलेला समुद्र पाहिला, अनुभवला. गुळगुळीत खडक, सच्छिद्र खडक, खडकांचे सुळके, त्यावर उगवलेल्या वनस्पती, त्यावर पोसले जाणारे कितीतरी जीवजंतू अशा जैवविविधतेने नटलेलं समुद्राचं अंतरंग बघितलं. गोव्यातील समुद्राचं पाणी अस्वच्छ असल्यामुळे पाण्याखाली स्पष्ट दिसण्यास अडचण येत होती. अंदमानचा समुद्र तुलनेनं स्वच्छ असल्यामुळे स्कुबाचा आनंद अधिक मिळतो असं मार्गदर्शकांकडून कळलं. पाण्याच्या दाबामुळे कानात दडे बसत होते. काही क्षण नाक दाबून धरले असता कानातील दडे सुटतात. रेग्युलेटर तोंडात धरून तोंड कोरडं पडत होतं. जबडा दुखायलाही लागला होता. याशिवाय हवेत मान गर्रकन वळवून जसं आपण पाहू शकतो तसं पाण्याखाली होत नव्हतं. मान पाण्यात असताना 'स्लो मोशन' मध्ये फिरत होती. पण पाण्याखालची जीवसृष्टी हे सर्व त्रास विसरायला लावत होती. पाण्याखाली दिसणारे जीव आहेत त्याच्यापेक्षा आकाराने मोठे भासत होते. आमच्याबरोबरच्या काही मंडळींना श्वसनाचं तंत्र न जमल्यामुळे १० ते १५ मि. ते पाण्याबाहेर आले होते.

आम्ही जवळजवळ ४० ते ४५ मिनिटं खोल समुद्रात (सुमारे ३६ ते ४० फूट) होतो. हा अनुभव घेतल्यावर आपण उगाचच डाईव्ह करायला घाबरत होतो, असंही जाणवलं. कधीही न विसरता येण्याजोगा 'स्कूबा'चा थरार मी अनुभवला होता. आपल्या एक-एका श्वासाची जाणीव आपल्याला करून देणारा, आपल्याला आत्मविश्वास देणारा 'स्कूबा डायव्हिंग'चा अनुभव एकदा तरी प्रत्येकानं घ्यावा, असं मला मनापासून वाटतं...

**चि. रुचिर कुलकर्णी** (इ. १०वी)
सी - २०४, पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २, पुणे ९

मेघ सावळा फुलारुनिया, विरघळला अंबरी। कलत्या रविचे ऊन विंचरीत, आल्या श्रावणसरी।।



**जरूर शोधा...** www.sft.edu/tips/tips.html (अभिनय कसा करावा, दिग्गज व्यक्तींचे मार्गदर्शन)
**प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे.**

**पाहिलेच पाहिजे असे काही...**

# द कराटे किड




**-कु. मृण्मयी परळीकर**

अमेरिकेचा नागरिक असलेला एक मुलगा. वडील अगदी लहानपणी वारले होते. त्यामुळे आई आणि तो मुलगा असं दोघांचं विश्‍व. उदरनिर्वाहासाठी आईची नोकरी. अचानक आईची बदली चीनला होते. या दोघांपुढे चीनला स्थायिक होण्याखेरीज काही पर्यायच नसतो. अशा परिस्थितीत अमेरिकतलं आपलं घर, नातेवाईक, तिथले मित्र आणि शाळा सोडून तो त्याच्या आईबरोबर चीनमध्ये येतो. चीनचं वातावरण, संस्कृती, सगळं खूपच वेगळं असतं. मुलाला त्या वातावरणाशी जमवून घ्यायला जड जात असतं. शाळेत त्याच्या वर्गातले खोडकर मित्र (अर्थात त्यांना मित्र म्हणता येणार नाही) त्याला एकटं पाडतात. त्याची टर उडवतात, त्याच्या खोड्या काढतात. त्याच्या दिसण्यावर, त्याच्या राहण्यावरून त्याला चिडवतात. इथेच त्याला एक छान मैत्रीण मिळते आणि हाऊस कीपिंग करणारे मि. हानसुद्धा. त्या मुलाचं नाव असतं ड्रे पार्कर. ड्रेच्या घरातला गिझर चालू नसताना आणि तो टिव्हीवर बघून कराटे शिकण्याचा प्रयत्न करत असताना योगायोगाने तो मि. हानला भेटतो. एके दिवशी मित्रांच्या खोडीला, खोडीला कसलं कुरघोडीला प्रत्युत्तर देण्यासाठी हा त्यांच्यावर सांडपाणी फेकतो; पण दुर्दैवाने त्यांच्या तावडीतही सापडतो. ती सगळीच मुलं चीनचा राष्ट्रीय खेळ 'कुंग फू' चे विद्यार्थी असतात. ते याला बेदम मारत असतानाच त्याला त्यांच्या इमारतीत हाऊस कीपिंग करणारे मी. हान वाचवतात आणि इथून सुरू होतो त्या ड्रे पार्करचा खरा प्रवास.

ड्रे पार्कर मि. हानला कुंग फू शिकवण्याची विनंती करतो. त्याने खूप विनंती केल्यानंतर मि. हान तयार होतात. ड्रे, मि. हानला घेऊन कुंग फू शाळेत जातो. समोरच्याला कितीही लागलं, तरीही क्षमा न करण्याचं कुंग फू गुरूचं तत्त्व बघून, मि. हान व्यथित होतात. त्या वात्रट मुलांच्या गुरूला कुंग फूचा खरा उद्‌देश समजवण्यासाठीच ड्रे पार्करला स्पर्धेमध्ये उतरवण्याचं मि. हान ठरवतात. कुंग फू गुरूंचं (मि. चेंग)स्पर्धेचं आव्हान मि. हान स्वीकारतात. आता मि. हान समोर असतं स्पर्धेचं प्रचंड मोठं ध्येय!

तयारीच्या पहिल्या काही दिवसांत मि. हान ड्रे ला फक्त त्याचं जॅकेट खुंटीवरून पाडायला, उचलायला आणि खुंटीवर लटकवायला लावतात. ड्रे एकसारखी तीच कृती करून कंटाळतो. हे असं करून आपण कुंग फू कसं शिकणार? हा प्रश्‍नही त्याला पडतो. मि. हान त्याला त्यामागचा उद्‌देश सांगतात. प्रत्येक गोष्ट करताना आपला सकारात्मक दृष्टिकोन असला पाहिजे, हे त्याला कळतं. कुंग फू आपल्या दैनंदिन जीवनात मुरलं आहे आणि ते आपल्याला जॅकेट फेकण्यापासून, उचलण्यापर्यंत सगळ्यात दिसतं, यावर ड्रे चा विश्‍वास बसतो. तो कसून मेहनत करत असतानाच त्यातून मजाही खूप घेत असतो. तो मि. हानबरोबर मॅजिक वॉटर प्यायला एका प्रचंड उंच ठिकाणी असलेल्या कुंग फू शाळेमध्ये जातो आणि तिथे त्याच्या कुंग फूला एक वेगळंच वळण मिळतं. तिथे एक स्त्री कोब्राला नियंत्रित करताना त्याला दिसते. तेही कड्याच्या एका टोकावर!! त्यानंतर तोही भरपूर तयारी करतो आणि त्याला ही तयारी करत असतानाच खूप चांगला मित्रही मिळतो, तो म्हणजेच मि. हान! अनेक भावनिक पदर असलेलं गुरू-शिष्याचं नातं, जीवलग मित्र म्हणून समृद्ध झालेलं त्या दोघांचं-ड्रे आणि मि. हान यांच्यातील नातं यांचं नितांत सुंदर दर्शन आपल्याला या चित्रपटाद्वारे पाहावयास मिळतं. पार्करनी केलेल्या मेहनतीला स्पर्धेमध्ये फळ मिळतं का? ती खोडकर मुलं ड्रे पार्करला त्रास द्यायचं थांबवतात का? त्याच्या मैत्रिणीचं काय होतं? आणि मि. हान बरोबरची ड्रे ची मैत्री तशीच टिकते का? या प्रश्‍नांच्या उत्तरासाठी आणि एका मुलाचा



तडजोडीने जगताना कित्येक ऋतू, वाट पाहून परतून गेले। दारात थांबलेले पावसाचे थेंब, मातीतच मिसळून गेले।।

**जरूर शोधा...** www.drawingnow.com (चित्रकलेतील विविध तंत्रांविषयी माहिती, व्हिडिओज्)



**प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.**



कुंग फू चे प्रशिक्षण घेताना

जिद्दीचा प्रवास अनुभवण्यासाठी हा चित्रपट जरूर पाहिलाच पाहिजे.

चित्रपटातील मि. हान., ड्रे पार्कर त्याची आई आणि स्पर्धेकडे जीवन मरणाच्या दृष्टिकोनातून बघणारा कुंग फू प्रशिक्षक चँग या सर्वांचाच अभिनय अप्रतिम.

साऊड्रे अर्थात जेडन स्मिथ नी निभावलेला शिष्य, आणि मि. हानच्या भूमिकेत जॅकी चेन केवळ अप्रतिम. जॅडेन स्मिथ नी ड्रे पार्करची तळमळ, शिकण्याची जिद्द, चेंग बद्दलची भीती, अन्यायाविरुद्धची चीड आपल्या अभिनयाद्वारे उत्तम दाखविली आहे.

जॅकी चेननी त्याचा मार्गदर्शक, मित्र आणि त्याचबरोबर हाऊसकीपिंगवालाही मस्त उभा केला आहे. चीन–अमेरिका यांमधला सांस्कृतिक बदल दिग्दर्शक खूप चांगल्या पद्धतीनं दाखवतो. कथेचा गाभा कायम ठेवत त्यात रंजकता, शिवी फेस्टीव्हल (चिनी व्हॅलेंटाइन डे) सारखे सांस्कृतिक सण, तिथली माणसं, त्यांची मनस्थिती आणि कुंग फू सारखा क्रीडाप्रकार प्रभावीरित्या मांडला आहे. आपण बहरत समृद्ध होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन अत्यंत गरजेचा आहे. हे दिग्दर्शकानं कुठेही उपदेश न करता छोट्या प्रसंगांतून प्रभावीपणे दाखवले आहे. चित्रपटातील पार्श्वसंगीताने खूपच मजा आणली आहे आणि चित्रपट अधिकच रंजक झाला आहे.




**द कराटे किड** – प्रदर्शित – २०१०
**दिग्दर्शक** – हॅरॉल्ड झ्वॉर्ट **लेखक** – रॉबर्ट मार्क केमन
**अभिनय** – जेडन स्मिथ, जॅकी चॅन,
ताराजी हेन्सन, झेनवुई वाँग इ.
**पुरस्कार** – यंग आर्टिस्ट ॲवॉर्ड
**सर्वोत्तम अभिनेता** – जेडन स्मिथ (२०११)
**बेट ॲवॉर्ड** – सर्वोत्तम अभिनेत्री ताराजी हेन्सन (२०११)

❀❀❀

**– कु. मृण्मयी परळीकर** (इ. १०वी)
अ–४०२, चिंतामणी कोर्ट, ३२० शनिवार पेठ, पुणे ३०

## हास्य तरंग




*चित्रकार – कु. इरावती आनंद*

गंध पावसाचा आला, दशदिशांत दाटला। माझ्या मनात झुले, श्रावणाचा झुला।।

**जरूर शोधा...** www.drawingcenter.org (चित्रकलेच्या प्रशिक्षणाविषयी)

**प्रायोजक – स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे.**

# दुर्मिळ ते इंद्रधनू




हिरवी झाडे, हिरवे डोंगर, खळाळते पाणी आणि काळ्या मेघांनी गच्च भरलेलं आकाश हीच पावसाळ्याची ओळख! ऋतूचक्रातून एकदाच येणारा पावसाळा साऱ्यांना उल्हासित करून जातो. साऱ्या धरतीला नटवून जातो. शेतात पीक तरारते, वाऱ्यावर झुलते, हे पाहून त्या कष्टकरी शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद रेखाटणारा पावसाळा खरंच किती सुंदर असतो.

*'जिकडे तिकडे पाणीच*
*पाणी,खळखळणारे झरे'*

या ओळीप्रमाणेच सारे वातावरणच बदलून जाते. उन्हाळ्याच्या दाहक, उष्णतेने त्रासलेल्या मातीवर हा पावसाळा पाण्याचा वर्षाव करतो. मातीही कृतज्ञता म्हणूनच जणू तिचा 'मृद्‌गंध' साऱ्या आसमंतात व्यापून टाकते. प्रत्येकाच्या मनात आठवण ठेवूनच हा पावसाळा जातो.

पावसाळ्यात एका गोष्टीची आठवण आल्याशिवाय राहत नाही. ज्याचे सौंदर्य पाहातच राहावेसे वाटते, दोन ढगांवरून रंगांचा पूल बांधणारे, असे जे सर्वांनाच आवडते. ऊन-पाऊस असताना त्याचे दर्शन होते. ओळखा पाहू! ते म्हणजे 'इंद्रधनुष्य'.

एखाद्या दिवशी प्रचंड, काळेभोर ढग आकाशात अवतरतात. भरदिवसा जणू रात्रच सुरू होते. पाऊस पडून गेला की, धुक्याने झाकोळलेल्या कातळावरून खळाळणारे, उड्या घेणारे लहान लहान धबधबे दिसू लागतात. पावसाची सर थांबते. अचानक उघडीप येते तेव्हा सर्वत्र हिरवागार गालिचा पसरल्यासारखे वाटते. पाहावे तेथे मन वेडावून टाकणारी हिरवाई दिसते. क्वचित सूर्याला पावसाची मौज लुटायची लहर येते. मग ढगांना बाजूला सारून तो नभांगणात उतरतो. त्याची सोनेरी किरणे पावसात चमचमू लागतात आणि आकाशात ते मनोहारी इंद्रधनुष्य तरळू लागते. मनात बालकवींच्या ओळी अलगद उतरतात,

*''वरती बघता इंद्रधनूचा*
*गोफ दुहेरी विणलासे*
*मंगल तोरण काय बांधिले*
*नभोमंडपी कुणि भासे!''*

डोळ्यांचे पारणे फेडणारे हे सप्तरंगी इंद्रधनुष्य आकाशात तरळू लागले, की ते पाहण्याचा मोह कोणालाच आवरत नाही. लहान मुलांसाठी तर ही एक अजबच गोष्ट असते. आकाशाच्या बागेत एका ढगावरून दुसऱ्या ढगावर जाण्यासाठी जणू काही पूल असलेले सप्तरंगी इंद्रधनुष्य लहानग्यांच्या मनात घर करून जाते.

पण गेल्यावर्षी काही पुरेसा पाऊस झाला नाही. पावसाळा कधी आला आणि कधी गेला समजलेसुद्धा नाही. पावसाळ्याचे दिवस संपताच पाणीटंचाई जाणवू लागली. आकाशातले काळे ढग जणू वाऱ्याच्या ताब्यातच गेले होते. एखाद्या ठिकाणी ढग जमू लागले, की लगेच वारा त्यांना तिथून घेऊन जाई. काही शेतकऱ्यांना तर दुबार पेरणी करावी लागली ती केवळ पावसाअभावीच. पाऊस पडला नाही म्हणून तर डोंगरही हिरवाईने नटले नाहीत. पाऊसच कमी पडला म्हणून पावसाळ्यात सर्वांचे लाडके इंद्रधनुष्यही दिसले नाही.

जागतिक तापमान वाढीमुळे, अफाट जंगलतोडीमुळे, पाऊस आपल्याकडे पाठ फिरवणार! असं चित्र दिसत आहे. पर्यायाने इंद्रधनुष्याचे दर्शनही आपल्याला दुर्मिळ होणार! आपणच केलेल्या पर्यावरणाच्या हानीमुळे स्वत:च्याच पायावर आपण धोंडा पाडून घेतोय. सृष्टीतील या छोट्या-मोठ्या आविष्कारांना आपण हळूहळू मुकतोय. या विचारांनी माझे मन दु:खी झाले.

❁❁❁

**कु. सायली पाटील** (इ. ८ वी)
तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगाव

आल्या पावसाच्या सरी, वसुंधरा मोहरली। सुगंधित झाली माती जणु किमया गं घडली ।।

**जरूर शोधा...** www.webstoregame.com (व्हिडिओ गेम्स् विषयी)
**प्रायोजक - श्री. अजित विद्याधर परांजपे, अमेरिका.**

# सबलेचे रूप






वरदायिनी तू सहहृदयाची
प्रेरणा नवचैतन्याची,
शिल्पकार नवनिर्मितीची,
आत्मनिर्भय स्वाभिमानाची।

स्वयंस्फूर्तीचा तू सन्मान
कुटुंबवत्सला हा अभिमान,
नेतृत्वाची राखी शान,
सगुणांचा हा सन्मान।

कन्या, भगिनी, माता,
प्रिया अन् कांता,
नात्यांची ही विविधता,
एकरूपी गुंफे गाथा।

सर्वस्वाचे दान करोनी
त्यागमूर्ती ही निसर्गतः,
वेळ आली आज तिजवरी,
सिद्ध करण्या 'स्व'त्वा।

भूषण स्त्रीचे शालीनता
वागण्यातली मार्दवता,
परी स्वातंत्र्याची हाती मशाल,
पेटवी अन्यायास झुगारण्या।

पेटेल वणवा, भडकेल ज्वाला,
होईल भस्म अन्याय–अत्याचार
एकमुखाने म्हणतील सारी, तू न अबला,
तूच खरी सबला, तूच खरी सबला।

***चित्रकार*** *– कु. रेवती पाटील*

**– कु. सिद्धी नलावडे,** (इ. ८वी ) फाटक हायस्कूल, रत्नागिरी

---

# मैत्री



मैत्री म्हणजे प्रेमाचा झरा
त्यावरून वाहणारा विश्वासाचा गार वारा

झऱ्यात असतं आपुलकीचं पाणी
ते गातं आपल्या मैत्रीची गाणी

झऱ्याच्या काठावर अनेक झाडं बहरतात
प्रवाहात आपलेच प्रतिबिंब पाहतात

याच झऱ्यात एक जलपरीही राहते
एकाकी प्रसंगी तीच साथ देते

या प्रवाहात अनेक खाच खळगे, दगड असतात
मैत्रीचा झरा पण कधीच आडवू न शकतात

***चित्रकार*** *– कु. संयुक्ता राऊत*

**– कु. ईशा लवळेकर** (इ. १० वी)
२४, विवेक सोसायटी, पद्मावती, पुणे – ९



अरे पावसा पावसा जा रे अशा दूरदेशी। तहानली व्याकुळली वाट पहाते धरती।।



**जरूर शोधा...** www.digvijaypratishthan.com (घोडेस्वारीच्या प्रशिक्षणाविषयी)
**प्रायोजक – श्री. राजेश शंकर शेलार, पुणे.**

*मी आजच आलेय परत... आता थोडं वाईट आणि खूप छान वाटतं, ताजतवानं झाल्यासारखं 'नवीन काही' घेऊन मी परत आलेय! बऱ्याच नवीन गोष्टी उमजल्या आहेत. राग कमी येतोय, आधी आजी आजोबा जे सतत सांगूनही मी ऐकायचे नाही ते सगळं सहज करते, अगदी त्यांनी न सांगताही!!*



# काही उमगले... काही गवसले...

**– कु. आर्या बर्वे**

आज अगदी नेहमीप्रमाणे बाहेर पडतच होते आणि आजीची नेहमीचीच हाक ऐकू आली.

''टोपी घालून मगच जा हो.''

काय करणार? ऐकावंच लागलं. अगदी suncoat सुद्धा घालावा लागला!

घरचे लोक किती काळजी करतात माझी. अगदी अनाठायी! तर, मी class ला जायला निघाले.

signal शेजारची नेहमीची मुलगी परत मला विचारायला आली, 'गजरे हवेत?'

मला रागच आला. मी उत्तर न देताच निघाले. आजोबा सोबत असते, तर नको असतानाही त्यांनी गजरे घ्यायला सांगितले असते.

ते सारखे म्हणत असतात, ''तुझ्या एवढीच पोर ती! बघ किती कष्ट करतेय. अशा मुलांबद्दल थोडा तरी कळवळा असावा गं ठमे''

मला ते कळतं आणि नाही सुद्धा कळत! **जाऊ दे नं...**

परीक्षा संपली. शाळेला सुट्टी लागली. मला आजोबा आणि आज्जी घेऊन गावी चाललेत. म्हणजे खेड्यात. आता ही काय जागा आहे का सुट्टीत फिरायला जायची?

मी तसं म्हटलं तर आजोबा नुसतेच हसले. मला इतका राग आला. नंतर आजीनं समजावलं, ''नाही होणार तुला बोअर. कधी कधी आपण समुद्रावरही जाऊ.''

तसंही काय म्हणा आठवडाभर तर जायचंय. यावेळी आई-बाबा नाहीयेत सोबत. पहिल्यांदाच! त्यामुळे मात्र कदाचित वेगळं वाटतेय. **जाऊ दे नं...**

मी आत्ता गावी आलेय. मला वाटलं होतं तेवढं काही विचित्र नाहीये गावात. भरपूर मोकळी जागा आणि छोटी, पण छान घरं आहेत आजूबाजूला. भाषा, कपडे आणि घरातलं वातावरण तेवढं वेगळं आहे. आजीला हे सांगितलं तर म्हणाली, 'वातावरण' थोडसं वेगळं आहे हा मात्र छोटा नाही तर चांगलाच मोठा फरक आहे.'' ती हसली. मला नीट कळलचं नाही तिच्या हसण्याचं कारण. **जाऊ दे नं...**

मी आत्ताच दुपारी संगीताशी बोलत होते. हसतमुख मुलगी आहे ती! वयानं ती माझ्याएवढीच आहे. पण ती काय काय करते हे ऐकून मी चाटच पडले. सकाळी २ किलोमीटरवर जाऊन पाणी आणते. शिवाय छोट्या भावाला सांभाळते. शेतावर काम करते, स्वयंपाक येतो. हे सगळं करून मग अभ्यास!

ती सांगत होती, ''धड पाऊसही नाही पडला. खूप दुष्काळ आहे. गेली दोन वर्षे पीक नीट येत नाही.''

ही इतके कष्ट करते पण तरी इतकी खुश राहते? कशी काय? 'पुढे शिक्षिका होऊन या गावातच शिकवायचं आहे तिला. माझे आजोबा तिला मदत करतात अभ्यासात. मलाच माझं कसंतरी वाटलं. मी अभ्यासाचा किती आळस करते. किती फालतू





जरूर शोधा... www.naswde.org (समाजसेवेच्या उपक्रमांबद्दल)

प्रायोजक – सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे.

गोष्टीवरून सुद्धा मला राग येतो. आपल्या शहरात सगळं सोपं, सहज उपलब्ध आहे, तरीपण आपण तक्रारी करत असतो. आता यावेळी **'जाऊ दे नं...'** नाही येत म्हणता!

'सर्वांबद्दल ओलावा!' म्हणजे हेच तर नव्हे? आजोबा, आजी, आई, बाबा कायम जे बोलत असतात नं, ते हेच! बहुतेक आपल्या शहरी मुलांना इतर लोकांची किंमत, परिस्थितीची जाणीवच नसते. आपण किती मज्जेत असतो आपल्या आपल्यातच!

मी आजच आलेय परत.. आता थोडं वाईट आणि खूप छान वाटतंय. ताजंतवानं झाल्यासारखं! 'नवीन काही' घेऊन मी परत आलेय! बऱ्याच नवीन गोष्टी उमजल्या आहेत. राग कमी येतोय. आधी आजी-आजोबा जे सतत सांगूनही मी ऐकायचे नाही, ते सगळं आता सहज करते. अगदी त्यांनी न सांगता!!

आज लक्षात ठेऊन दिवे, पंखे मुख्य म्हणजे नळ बंद आहेत, हे पाहूनच घरातून निघाले. रेनकोट घातला आणि सिग्नलवर आई




आणि आजीसाठी गजरेसुद्धा घेतले. टपटप पाऊस पडत होता... आकाशातून... आणि... आणि... माझ्या डोळ्यांतून देखील...

❋❋❋

– **कु. आर्या बर्वे** (इ. १०वी)
'रमा', १६ ब, गल्ली क्रं.९,
शिक्षकनगर, कोथरूड, पुणे ३८
***चित्रकार*** *– कु.अनुष्का तळणीकर*

---

### मुखपृष्ठाच्या आतील पानावरील तेलुगु पद्याचा भावार्थ

## पिल्ललारा पापल्लारा...

या अंकात स्वातंत्र्य दिनानिमित्त एका भारतीय भाषेतलं पद्य असावं असं वाटत होतं. देशभक्ती किंवा राष्ट्रप्रेमाला कुठल्याच भाषेचं, प्रांताचं बंधन नसतं. या पद्यातून **'आद्यशंकराचार्य'** त्यांच्या शिष्यांना संबोधत आहेत. तेलुगु भाषेतल्या या पद्याचा भावार्थ खाली दिला आहे.

''मुलांनो, बाळांनो, या उज्ज्वल भारताच्या उद्याच्या नागरिकांनो आणि मोठ्यांनाही मार्ग दाखविणाऱ्या उत्तम मार्गदर्शकांनो, मी तुमच्या डोळ्यांत पौर्णिमेचे चांदणे पाहतोय. तुम्ही उद्याच्या भारताचे नेतृत्व करणार आहात. त्यासाठी तुम्ही बलवान, बुद्धिमान आणि कीर्तिमान व्हा. अडचणींना सामोरे जायला तयार व्हा आणि त्या स्वत:च्या हिंमतीवर पेलायला शिका. हे करत असताना देवाचे नित्य स्मरण राहो. तुमच्या मनात देव विराजमान होवो. सगळ्यांमध्येच देव बघायला शिका. सगळ्यांचा आदर करा. तुम्ही या भारतमातेचे लाडके सुपुत्र आहात. भारतमातेला तुमच्याबद्दल खूप प्रेम आहे. ते जपा, वृद्धिंगत करा. हा आपला संपूर्ण भारत देश, आपली मातृभूमी म्हणजे आपलं घर आहे. तुम्ही सगळे जण म्हणजे या मातृभूमीचे डोळे आहात. तुमच्यामधून तिला उद्याचं भविष्य आणि आजचा वर्तमान दिसत आहे. वांशिक आणि पारंपरिक गौरव सांभाळा, जतन करा. सगळ्यांशी मिळून-मिसळून राहा. एकी वाढवा. कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करा. राष्ट्राचं भविष्य उज्ज्वल करा आणि भारतमातेला एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवा. तिचा आदर, सन्मान करा. तो जपा व उत्तरोत्तर वृद्धिंगत करा.''

**भारत माता की जय! वंदे मातरम्!**



श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे। क्षणात येती सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे।।



**जरूर शोधा...** Jewellarymaking.about.com (आभूषणे कशी बनवावीत याविषयी)
प्रायोजक - श्री. शंतनू पटवर्धन, इलिनॉइस, अमेरिका.

# रेन वॉटर हार्वेस्टिंग

**– चि. वरद बनसोड**

'रेन वॉटर हार्वेस्टिंग' म्हणजेच पावसाळ्यात पावसाचं पडलेलं पाणी साठवून ठेवणं. 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' अनेक पातळ्यांवर करता येतं. जसे की, वैयक्तिक पातळीवर, गृहरचना संस्था, शाळा किंवा त्यापेक्षाही मोठ्या पातळीवर. आम्ही मागील वर्षी म्हणजेच इयत्ता आठवीमध्ये असताना याच विषयावर सर्वेक्षणात्मक प्रकल्प केला होता. त्यासाठी आम्ही एकूण ५ प्रकल्पांना भेटी दिल्या.सर्वेक्षणाची सुरुवात आम्ही आमच्याच शाळेच्या, ज्ञान प्रबोधिनीच्या नवीन वास्तूपासून केली. प्रथम प्रकल्पाचा आराखडा बघण्यासाठी आम्ही शाळेच्या वास्तू विस्तार कार्यालयात गेलो आणि शाळेच्या रेन वॉटर हार्वेस्टिंगचा आराखडा घेऊन, प्रकल्प प्रमुखांकडे गेलो. त्यांनी आम्हाला प्रकल्पाची जागा दाखवली. त्यांनी कमीत कमी जागेचा वापर करून मोठा प्रकल्प तयार केला होता. ते पाहून आम्हाला नवल वाटले व आमचा सर्वेक्षण करण्याचा उत्साह आणखी वाढला.

हा सर्वेक्षणात्मक प्रकल्प करत असताना आमच्या हाती काही महत्त्वाची माहिती मिळाली. 'रेन वॉटर हार्वेस्टिंग'च्या दोन प्रमुख पद्धती आहेत. पहिली म्हणजे घराच्या अथवा इमारतीच्या छतावर पाणी अडवण्याची जागा अर्थात 'वॉटर कॅचमेंट एरिया' बनवणे आणि ते पाणी टाकीमध्ये साठवणे. नंतर शुद्ध करून ते पाणी वापरणे.

दुसरी पद्धत म्हणजे 'पाणी अडवा, पाणी जिरवा आणि पाणी वाचवा' या पद्धतीत बंधारे बांधून पाणी अडवणे. नंतर ते जिरलेले पाणी उपसून शुद्ध करून वापरणे. सर्वेक्षण करताना आम्हाला प्रामुख्याने पहिली पद्धत जास्त दिसून आली.

**रेन वॉटर हार्वेस्टिंगची वैशिष्ट्ये –**

रेन वॉटर हार्वेस्टिंगची पहिली पद्धत सध्याच्या काळासाठी खूप कार्यक्षम आहे. फार कमी म्हणजे अवघ्या वीस ते पंचवीस मीटर जागेपासून पाचशे ते सहाशे मीटरपर्यंतच्या जागेवर ही पद्धत वापरली जाऊ शकते. सरासरी प्रत्येक पावसाच्या वेळी आपल्याला दहा हजार लीटर पाणी साठवता येते.


Tag No. CP131045 ActiveLink | **व्हिडिओ पाहा**

नवीन प्रकल्प राबवताना काही अडचणी येतातच. तशा आम्ही पाहिलेल्या प्रकल्पांमध्येही आल्या होत्या. बांधकाम करताना येणारी मुख्य अडचण म्हणजे प्रकल्पासाठी विशिष्ट कच्चा माल न मिळणे. बांधकाम झाल्यानंतर गच्चीपासून टाकीपर्यंत पाणी वाहून नेणारा पाईप फुटणे. शुद्धीकरण यंत्रणेमध्ये दोष असणे किंवा नवीन तंत्रज्ञानाचा अभाव असणे, त्यामुळे पाणी अशुद्ध होऊन वाया जाणे इ. अनेक अडचणी आल्या तरीही अडचणींपेक्षा रेन वॉटर हार्वेस्टिंगचे फायदेच अधिक आहेत. रेन वॉटर हार्वेस्टिंगद्वारे पाणी वाचवणे ही काळाची गरज आहे, असे मला वाटते.

**घरगुती वापरासाठीचा प्रयोग**

**साहित्य –** अर्धे कापलेले पाईपस्, ७ × ५ मीटरचा पत्रा, गच्ची ते जमीनीवरील पाणी साठवण्याची जागा इतक्या लांबीचा बंद पाईप, एक टाकी किंवा जमीनीमधील प्लॅस्टिक कोटेड खड्डा, पाणी अशुद्ध करणाऱ्या वस्तू गाळण्यासाठीची चाळणी

**कृती –** या सर्व वस्तूंची सोबत दिलेल्या आकृतीप्रमाणे मांडणी करा आणि तुम्हीही व्हा रेन वॉटर हार्वेस्टर !






सर पावसाची आली। चिंब धरती न्हाली।।

**जरूर शोधा...** www.sculpture.org (शिल्प कसे तयार करावे याविषयी)



प्रायोजक – मे. सी. व्ही. कांड कन्सलटन्टस् प्रा. लि., पुणे.

| जगातील पाण्याचे टक्क्यांमध्ये वर्गीकरण केल्यास | |
|---|---|
| महासागर – | ९७.३ % |
| दोन ध्रुवांवरील बर्फ – | ०२.०% |
| भूमिगत जल – | ००.६८% |
| झऱ्यांमधील गोड पाणी – | ०.००९% |
| खारट सरोवरांमधील पाणी– | ०.००९% |
| वातावरणातील जलकण – | ०.००१९% |
| नद्यांमधील पाणी – | ०.०००१% |
| एकूण | १००% |







वरील चौकटीतील माहितीवरूनच आपल्या लक्षात येईल, की आपल्याला पिण्याच्या पाण्याचे संधारण अर्थात जलसंधारण करणे किती आवश्यक आहे.

आज फार कमी लोकांना हे माहीत आहे की, २२ मार्च रोजी 'जागतिक जलदिन' असतो. आपण जलसंधारणाबाबत गांभीर्याने विचार करायला हवा, त्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' करायला हवं. तो दिवस दूर नाही ज्या दिवशी आपल्याला पाण्याच्या एका-एका थेंबासाठी पैसे मोजावे लागतील. त्यामुळे आपल्याला मोफत मिळणाऱ्या या पावसाच्या पाण्याचा आपण पुरेपूर वापर करून घ्यायला पाहिजे.

### भारतातील महत्त्वाचे जलप्रकल्प

१. **भाकरा नांगल प्रकल्प** – हा प्रकल्प सतलज या नदीवर बांधला आहे. हा प्रकल्प भारतातला सर्वात उंच बांध आहे. येथील साठलेल्या पाण्यावर एक मोठे जलविद्युत केंद्र उभे आहे आणि जवळपास दोन राज्यांना ही वीज पुरवली जाते.

२. **इंदिरा गांधी कालवा प्रकल्प** – हा प्रकल्प राजस्थान येथे आहे. या प्रकल्पाला 'राजस्थान कालवा प्रकल्प' असेही म्हणतात. हा कालवा जगातील सर्वात लांब कालवा आहे. याचा मूळ उद्देश नदीचे पाणी शेतीच्या सिंचनासाठी पुरवणे हा आहे.

३. **कोसी प्रकल्प** – हा प्रकल्प बिहार येथे आहे. हा प्रकल्प भारताने नेपाळच्या सहयोगाने बांधला आहे. याचा मूळ उद्देश नदीचा पूर रोखणे हा आहे.

४. **हिराकूड बांध** – हा प्रकल्प ओरिसा येथे आहे. हा भारतातील सर्वात लांब बांध आहे. याचा मूळ उद्देश डेल्टा प्रदेशातील पूरांवर नियंत्रण करणे हा आहे.

५. **नागार्जुन सागर प्रकल्प** – हा प्रकल्प आंध्रप्रदेश येथे आहे. हा कृष्णा नदीवर बांधला आहे. हे श्री शैल्यम् मंदिर जतन करण्यासाठी बांधलेलं जलसंधारणाचं उत्तम उदाहरण आहे.

**–चि. वरद बनसोड** (इ. ९ वी)
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे



आला वादळवारा। बरसल्या पर्जन्यधारा।।



**जरूर शोधा...** ccrtindia.gov.in/classicaldances.html (नृत्याच्या वर्गांविषयी, व्हिडिओज्)
**प्रायोजक – डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड.**

# *गोरखगड-सिद्धगड-भीमाशंकर-गिरिभ्रमण सहल*

**– चि. तेजस घाडगे**

**मी** इयत्ता आठवीपासूनच 'छात्र प्रबोधन'चा वाचक आहे. अंकात येणारे गिरिभ्रमण सहलीचे निवेदन नेहमी वाचण्यात येत असते. अशा शिबिरांमध्ये आवर्जून मी सहभागी होतो.

त्यानुसार दोन वर्षांपूर्वी मी राजगड-तोरणा साहस सहलीला गेलो होतो. यावर्षीही गोरखगडला जाण्याचा योग जुळून आला. एक तर बारावीची परीक्षा झालेली होती आणि 'छात्र प्रबोधन' बरोबर सहलीला जाणे ही पर्वणी असते. आपल्या क्षमता आपल्याला तपासून बघण्यासाठीची ही अपूर्व संधी असते.

आम्ही सर्वजण दुपारी जेवण करून पुणे स्टेशनला पोहोचलो. पुणे स्टेशनवरून आम्ही कल्याणला जाणारी ट्रेन पकडली. संध्याकाळी ६ वाजता आम्ही कल्याणला पोहोचलो. तेथून आम्ही कल्याण बसस्टँडवरून मुरबाडची बस पकडली. येथे आम्हाला बसमध्ये शिरण्यासाठी प्रयत्न करावे लागले. जागाच नसल्यामुळे काही मुलांना ड्रायव्हरच्या केबीनमध्ये बसवले. रात्री ८.३० वा. आम्ही मुरबाडला पोहोचलो. तेथून लगेचच देहरी या गावात जाण्यासाठी बस पकडली. रात्री १०.३०वा. आम्ही देहरी या गावात पोहोचलो. या प्रवासात आम्ही बसमध्येच प्रबोधनपर गीते म्हटली. देहरी या गावात जेवण करून आम्ही गोरखगड चढण्यास सुरुवात केली, तेव्हा रात्रीचे ११.०० वाजले होते. चढण थोडी अवघड होती. आम्ही रात्री १.३० वा. गोरखगडावर पोहोचलो. जाताना मंदिरापाशी पाण्याच्या बाटल्या भरून घेतल्या. गडावर आम्ही गुहेमध्ये मुक्काम करणार होतो. परंतु गुहेकडे जाणारी चढण खूपच कठीण असल्यामुळे आम्ही सर्वांनी तेथून थोडी खालीच सपाट जागा होती तिथेच मुक्काम केला. ती जागा फारशी सपाट नव्हतीच. तेथे सर्वत्र दगड पसरलेले होते. पण थोडीफार जागा करता आली. रात्री आम्ही ३.०० वाजता झोपी गेलो. रात्रभर खूप गार वारा असल्यामुळे झोप लागली नाही. पहाटे ५.३० वा. आम्ही



गोरखगड

**ही गिरिभ्रमण सहलआमच्यासाठी 'साहस सहल'च होती. पदोपदी साहस अनुभवायला मिळत होतं. अवघड चढण पार करून गडावर सहीसलामत पोहोचल्यावर आमचा आम्हालाच अभिमान वाटत होता. गडांची केलेली सैर खूप काही शिकवून गेली. तो एक सुखद आणि अविस्मरणीय अनुभव होता.**
**असेच अनुभव मिळवायला तुम्हीही उत्सुक आहात नं? त्यासाठी 'छात्र प्रबोधन'शी जरूर संपर्क करा.**

आमच्या सॅक तेथेच ठेवून गुहेकडे प्रस्थान केले. गुहेमध्ये आम्ही सर्वजणांनी उपासना केली. नंतर थोडेसे चढण चढून गडाच्या मुख्य माथ्यावर प्रवेश केला. गडावर एक लहानसे मंदिर होते. वारा खूप छान वाहत होता. गडावरून मच्छींद्रगड एकदम लहान दिसत होता. गोरखगड उंचीने कमी होता, परंतु त्याची चढण कठीण आणि अवघड होती. गडावर आम्ही प्रबोधन गीते म्हटली. आता ज्या अवघड वाटेवरून आम्ही गड चढलो तेथूनच तो गड उतरायचा होता. अनेकवेळा चढण्यापेक्षा उतरताना जाणवणारी भिती काही ठिकाणी आम्हालाही जाणवली. अखेर हळूहळू सगळे खाली उतरलो. खालून वर नजर टाकल्यावर तो गड बघून, हा सर केल्याबद्दल आम्हीच एकमेकांचे कौतुक केले. आता सिद्धगडकडे कूच करण्यासाठी सिद्धगडवाडीचा रस्ता पकडला.

आम्ही सिद्धगड चढण्यास सुरूवात केली होती. आम्ही म्हणजे नितीशदादा, सम्मितदादा, सौरभ आणि मी. आम्ही सर्वांत मागे चालत असल्यामुळे पुढे



झिम्मड पाण्याची, अल्लड वाऱ्याची, सर येते पावसाची।।

**जरूर शोधा...** www.wikihow.com (वेशभूषेविषयी माहिती, मार्गदर्शन)



**पाचवी ते नववीसाठी मानसपट मापन -** प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ ०२०-२४२०७१४५



भीमाशंकरच्या मार्गावर

चालणाऱ्या गटामध्ये व आमच्यामध्ये अंतर पडलं होतं. सम्मितदादा पुढे चालत होता. ५–१० मिनिटे चालल्यावर आम्हाला पायवाटच सापडेना. आम्ही ज्या पायवाटेवरून चालत होतो ती पुढेच संपलेली होती. तेव्हा नितीशदादाने पुढे जाऊन वाट शोधली; पण ती वाट म्हणजे एक मोठा खडक होता. कसलीही दोरी न बांधता फक्त आमच्या हाता–पायांची पकड मजबूत करून तो खडक आम्हाला चढायचा होता. ती चढण चढण्याशिवाय आमच्याकडे दुसरा कोणता पर्यायच नव्हता. कारण मागे खोल दरी होती. सावकाशपणे अत्यंत सावधरित्या आम्ही ती चढण, तो खडक पार केला व गडावर जाणाऱ्या नेहमीच्या पायवाटेने चालू लागलो. गडावर जाणारी पायवाट सापडल्यावर जो आनंद झाला होता, तो इथे शब्दांत मांडणं अशक्य आहे. आम्ही थोडं चालून पुढे गेलो, तेवढ्यात अमेय दादाने आवाज दिला. आमच्यापुढे जो गट होता तो देखील वाट चुकला होता. सुदैवाने तो गट ज्या पायवाटेवरून चालत होता, ती पायवाट पुढे येऊन गडाच्या नेहमीच्या पायवाटेला मिळत होती; पण थोडीशी अवघड चढण त्यांनाही पार करावी लागणार होती. आम्ही सर्व दादांनी लगेच हाताची साखळी केली व सर्व मुलांना त्या अवघड चढणीवरून रोजच्या पायवाटेवर नेऊन सोडले. साधारण ४–५ तासांच्या त्या कष्टानंतर आम्ही सिद्धगडवाडीत पोहोचलो. सिद्धगडवाडीतून आम्ही ज्या पायवाटेने येण्याचे साहस केले होते, ती पायवाट बघितल्यावर पहिल्यांदा पोटात क्षणभर भितीचा गोळाच उभा राहिला. आपण ही चढण पार करून गडावर सहीसलामत आलो त्याचा अभिमानही वाटला !




दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही सिद्धगडावर पोहोचलो. गडावरून सह्याद्रीचं जे दृश्य दिसत होतं, ते अविस्मरणीय होतं. गडावरून आम्ही आदल्या दिवशी चढलेला आणि उतरलेला गोरखगड दिसत होता. तुलनेने तो खूपच लहान दिसत होता. गडावरून जांभुर्डे धरणाचे जे दृश्य दिसत होते ते विहंगम होते. आजूबाजूला असणाऱ्या पर्वतरांगा व कळसुबाई शिखराचे टोक पाहिल्यावर असं वाटलं, की आपण एवढ्या कष्टानं गडावर पोहोचलो त्याचं काहीतरी सुखद फळ मिळालं.

गडावरून खाली येऊन आम्ही सर्वजण सिद्धगड वाडीवरून भीमाशंकरकडे चालत मार्गस्थ झालो. महेन्द्रभाईंनी सांगितल्याप्रमाणे आम्हाला घनदाट जंगल लागलं होतं. आदल्या रात्री पाऊस पडून गेल्यामुळे वातावरण खूप छान झालं होतं. आम्ही खिंड पार करून सपाट माळरानावरून कोंडावळे गावाची पायवाट पकडली. ही पायवाट शोधण्यासाठी खूप चालावं लागलं. बरीच रात्र झाल्यामुळे आम्ही सगळे भरभर चालत होतो. भीमाशंकर अभयारण्य बाजूलाच असल्यामुळे भीतीही वाटत होती. त्या रात्री आम्ही कोंडावळे गावामध्येच मुक्काम केला. गावकऱ्यांनी खूप आपुलकीने आमची जेवणाची, राहण्याची सोय केली. सकाळी आम्ही मस्तपैकी चुलीवर कोरा चहा आणि मॅगीचा आस्वाद घेतल्यानंतर अमेयदादा भीमाशंकरला जाण्यासाठी जीप घेऊन आला. मी, नितिशदादा, अमेयदादा आणि विनायकदादा असे चौघेजण जागेअभावी जीपच्या टपावर बसलो. टपावर बसून प्रवास करण्याचा जसा आनंद मिळाला त्याचबरोबर गांधीलमाशीचा प्रसादही मिळाला. सहलीत सगळ्यांना बरोबर घेऊन जात शोधलेल्या रात्रीच्या वाटा याचा अनुभव केवळ अविस्मरणीय! या सहलीतून संयम राखून निर्णय कसे घ्यायचे, एखाद्या प्रसंगाला सामोरे कसे जायचे तेही शिकायला मिळालं.

**– चि. तेजस घाडगे**
४५८८/१, जुना कराड नाका, पंढरपूर 413304

हे.''

चिंब भिजलेले, रूप सजलेले, बरसुनी आले रंग धरतीचे ।।



. **जरूर शोधा...** www.goodreads.com/shelf/show/marathi (प्रसिद्ध लेखकांची मराठी पुस्तके)

**पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन** - प्रज्ञा मानस संशोधिका , ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४



# 'स्व' ला ओळखताना...

मुलाखतकार – कु. अवंती पोरे

**'छात्र प्रबोधन'च्या कार्यानुभव उपक्रमात काम करताना तसेच विद्यार्थी विशेषांकाचे काम करत असताना मला ग्रामीण भागात किशोरी विकसनाचे काम करणारी कु. अपूर्वा राणे ही ताई भेटली. तिच्याशी ओळख झाल्यानंतर तिच्याशी आणखी काही गप्पा माराव्यात, तिच्याविषयी, तिच्या कार्याविषयी अधिक जाणून घ्यावं अशी उत्सुकता मनात निर्माण झाली. त्यानुसार मी तिच्याशी संवाद साधला आणि तिनेदेखील मनमोकळेपणाने माझ्या प्रश्नांची उत्तरे दिली. आपण स्वत: आपल्याला जाणून घेणे, आपल्याला आपला स्वभाव ओळखता येणे, बुद्धीची आणि भावनेची योग्य सांगड घालणे, यांमुळे द्विधा मन:स्थिती टाळता येते. त्यामुळे घेतलेले निर्णय बऱ्याच अंशी योग्य ठरतात, हे अनुभवांती तिनं सांगितलं.**

---

*** सर्वात प्रथम आम्हाला तुझ्या बालपणाविषयी जाणून घ्यायला आवडेल.**

माझ्या घरात माझे आई-वडील, लहान भाऊ आहेत. माझं शालेय शिक्षण 'सुविद्यालय' बोरिवली येथून मी पूर्ण केलं. माझं महाविद्यालयीन शिक्षण मी सेंट झेवियर्स कॉलेज, चर्चगेट, मुंबई येथून पूर्ण केलं. पदवीसाठी मी अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र हे विषय निवडले. आज पुढे येऊन माझ्या आवडत्या समाज-शास्त्र या विषयातच माझी कारकीर्द मी करणार आहे.

*** ताई, तू ग्रामीण भागात किशोरी विकासाचे काम करतेस, असे मला समजले आहे. त्याबाबत अधिक तपशिलात सांग.**

'ज्ञान प्रबोधिनी'च्या 'ग्रामविकसन' या विभागाची मी पूर्णवेळ कार्यकर्ती म्हणून कामाला नुकतीच सुरुवात केली. पुण्याच्या आसपासच्या गावांत, मावळ प्रांतात, डोंगराळ भागातील ठिकाणी जाऊन तेथील किशोरी व युवतींच्या सबलीकरणाचे प्रयत्न आम्ही करत असतो. त्या मुलींसाठी स्वयंरोजगार निर्माण करण्याच्या कामात मी सहभागी होत आहे.

या उपक्रमांमधून आम्ही ग्रामीण भागातील युवतींना स्वावलंबी बनवण्यासाठी प्रयत्न करतो. सर्व उपक्रमांपैकी आमचा पहिला वर्ग म्हणजे **होम नर्सिंग**. काही कारणाने इयत्ता ८ वीच्या पुढे शिकू न शकलेल्या युवतींसाठी हा वर्ग आहे. हा वर्ग ९ महिन्यांसाठी असतो. या वर्गाद्वारे ६ महिने युवतींना प्रशिक्षण दिले जाते व शेवटचे ३ महिने नसरापूर येथील सिद्धीविनायक हॉस्पिटलमध्ये या युवतींना प्रात्यक्षिकांची संधी दिली जाते. या वर्गामुळे अनेक युवतींना चांगल्या हॉस्पिटल्समध्ये रु. ७,००० ते १०,००० पर्यंतच्या पगाराची नोकरी मिळाली आहे.

दुसरा वर्ग म्हणजे **जास्वंद वर्ग**. या वर्गात आम्ही युवतींसाठी डॉक्टर्सची व्याख्याने आयोजित करतो; ज्याद्वारे त्यांच्या आरोग्याबाबत त्या दक्षता घेतील. याच वर्गात आम्ही महिन्यातून दोनदा शिवण आणि कलाकौशल्य शिकवतो; ज्यामुळे त्यांच्या बचतगटाला आर्थिक फायदा मिळेल.

तिसऱ्या वर्गात आम्ही या युवतींना **बालविकासाबाबत** प्रशिक्षण देतो, ज्यामुळे त्या बालवाडीच्या मुलांना उत्तम शिकवू शकतील.

आम्ही या उपक्रमात भाग घेणाऱ्या प्रत्येक युवतीची माहिती संकलित करतो. त्यांचे पुढील आयुष्यही नीट, सुरळीत राहील, याकडे लक्ष देतो. या उपक्रमांचा फायदा असा की, युवती कमावत्या व्हायला लागल्याने त्यांचे बालविवाह होत नाहीत. याबाबत आमचे आणखी परीक्षण चालू आहे. यामध्ये सर्वांत यशस्वी



दाटुनिया येता मेघ, भरे आकाश ओंजळ। मेघ बरसती निष्फळ, भरतात धरणे-तळ॥

**जरूर शोधा...** www.giridarshan.com (गडांची छायाचित्रे, ठिकाणे, त्यांची माहिती, व्हिडिओज्)

**राष्ट्रीय प्रश्नांवर मासिक व्याख्यानमाला** - संत्रिका, जनतंत्र उद्‌बोधन मंच, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१८७

उदाहरण म्हणजे किशोरी विकसन विभागाच्या प्रमुख अश्विनीताई ठाकर. त्या या सर्व शिबिरांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी व्हायच्या. आज त्या लग्नानंतर पुण्यात येऊन स्वत: किशोरी विकास विभागाच्या प्रमुख म्हणून यशस्वीरित्या सर्व कार्यभाग सांभाळत आहेत.

*** हे काम तुझ्यासाठी योग्य आहे, असे तुला कधी जाणवले?**

पदवीपर्यंतचे शिक्षण घेत असताना, मला माझ्या स्वभावाबद्दल काही गोष्टी लक्षात येत होत्या. मला नवीन गोष्टी करून पाहायला, घटनांचे विश्लेषण करायला आवडते. म्हणून माझ्या अंगीभूत गुणांना खतपाणी घालण्यासाठी आणि नवीन कौशल्य आत्मसात करण्यासाठी काही काळ अनौपचारिक शिक्षण घ्यावे, असा निर्णय मी घेतला. 'ज्ञान प्रबोधिनी' मध्ये निवासी राहून अशा प्रकारचे काम करता येते, हे मला समजल्यावर मी इथे आले.

*** शिक्षण घेत असताना एक वर्ष अनौपचारिक शिक्षण घ्यावे, हा निर्णय तू का घेतला?**

मला मनापासून वाटत होते, की समाजासाठी काही करावे. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या माणसांमध्ये राहून असे काही काम करता येईल अशा कार्यक्षेत्राची निवड करायची. त्यामुळेच चांगले गुण असूनही मी कला शाखेत प्रवेश घेतला; जेणेकरून मला माझ्या आवडीच्या कामाला वेळ देता येईल. निव्वळ पुस्तकी ज्ञानाने परिपूर्णता येत नाही. त्याचबरोबर पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देणंही गरजेचं आहे, असं मला जाणवलं.

*** हा निर्णय घेताना त्यामागची तुझी भूमिका काय होती?**

आपली स्वत:ची वेगळी ओळख असावी, असे मला सुरुवातीपासून वाटायचे. त्यामुळे औपचारिक शिक्षणातील त्रुटी माझ्यात राहू नयेत यासाठी मी एक वर्ष अनौपचारिक शिक्षणाचा निर्णय घेतला. हा निर्णय प्रत्येकाला पटेलच असे नाही; पण स्वत:चा स्वभाव, विचार, आवडीचे क्षेत्र ओळखून, दुसऱ्यांचे अनुकरण न करता निर्णय घेतल्याने मला त्या निर्णयाचे पूर्ण समाधान मिळाले. प्रत्येक माणूस सारखा नसतो. त्यामुळे प्रत्येकाने एकसारखे निर्णय घेणे योग्य नाही, असे माझे मत आहे. प्रत्येकाने आपल्या भावना, गरजा, स्वभाव ओळखणे महत्त्वाचे आहे.




*** या निर्णयात तुझ्या आई–वडिलांचा प्रतिसाद कसा होता?**

जेव्हा मी एक वर्ष पूर्ण वेळ काम करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा तो निर्णय माझ्या आई–वडिलांना पटला नव्हता. अजूनही तो पूर्णपणे पटलेला नाही; पण मी माझ्या निर्णयावर ठाम होते. मी माझ्यापरीने त्यांना माझा निर्णय पटवून द्यायचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांनी तो निर्णय जराशा नाराजीनेच का होईना, मान्य केला.

*** निर्णय अंमलात आणल्यावर तुझा अनुभव कसा होता?**

खूपच छान! माझा निर्णय चुकला नव्हता, असे मला सारखे जाणवत होते. माझ्या पुस्तकी ज्ञानाला अनुभवाची जोड 'ज्ञान प्रबोधिनी'मुळेच मिळाली. अनुभवातून समृद्ध होण्याची माझी इच्छा पूर्ण होते आहे. या प्रक्रियेतून मला बरेच काही शिकायला मिळाले. वेगवेगळ्या परिस्थितीला सामोरे गेल्यावरच स्वत:ची खरी ओळख होते. त्यामुळे 'ज्ञान प्रबोधिनी'त काम करताना मला अशीच स्वत:ची ओळख होत आहे. याचा उपयोग मला भविष्यातील निर्णय घेण्यासाठी होईलच!

*** निर्णय घेताना कोणकोणत्या गोष्टींचा विचार करावा, असे तुला वाटते?**

आपण स्वत:चा स्वभाव, विचार, भावना, या गोष्टींचा खोलवर विचार करून निर्णय घ्यावा. आपण स्वत:चा स्वभाव ओळखू शकतो. यासाठी स्वत:च्या वागण्याचे वेगवेगळ्या परिस्थितींमधील निरीक्षण मदतीचे ठरते. त्यानुसार आपण आपल्या स्वभावाचे विश्लेषण करू

ढगांची किमया, पाऊस सरी, धरतीवर येऊन चमत्कार करी ॥

**जरूर शोधा...** www.giripremi.com (गिरिभ्रमणाच्या मोहिमांविषयी, व्हिडिओज्)

**'उमलत्या' वयाशी जुळवून घेताना** (लैंगिकता शिक्षण व जाणीव संवर्धन) - संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२

शकतो. अशाने आपलीच प्रतिमा आपल्याला स्पष्ट होत जाते.

स्वभावाप्रमाणेच भावनांनाही निर्णयप्रक्रियेत महत्त्वाचे स्थान असते. भावनांच्या भरात कधीही निर्णय घेऊ नयेत. कृती करण्याची प्रेरणा भावनेपासून मिळत असते. पण क्षणिक भावना किंवा नकारात्मक भावनेतून घेतलेला निर्णय सफल होण्याचे प्रमाण खूप कमी असते. म्हणून योग्य भावनेने घेतलेले निर्णय अंमलात आणणे सोपे जाते; कारण तेव्हा मन आणि बुद्धीची सांगड घातल्यामुळे द्विधा मन:स्थिती टाळता येते. स्वत:चा स्वभाव, भावना जाणून निर्णय घेणे बरेच काही शिकवत असते.

*** तुझ्यासारख्याच सामाजिक क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना तू काय सांगशील?**

मी त्यांना एवढेच सांगेन की, आपला मूळ स्वभाव, भावनांना ओळखा. आपल्याला नक्की काय आवडते त्याचा विचार करा. म्हणजे ठाम राहून द्विधा मन:स्थितीवर मात करता येईल. झोकून देऊन मनापासून आवडत्या क्षेत्रात काम करा. प्रत्येकानं असं ठरवलं, तर विकासाची गंगा तळागाळातील व्यक्तींपर्यंत पोहोचण्यास मदत होईल.

***

**– कु. अवंती पोरे** (इ. १०वी)
फ्लॅट नं. १०, गिरिधर पारिजात अपार्टमेंट,
सदाशिव पेठ, पुणे – ३०

आवाहन

## ऐका हो ऽऽऽ ऐका ऽऽऽ
### ‘पूर्ण कविता मिळवा आणि आम्हाला कळवा’

या अंकात तळटिपेत विविध कवींच्या पावसावरच्या ओळींचा समावेश केला आहे. ती ओळ ज्या कवीच्या कवितेतील आहे ती पूर्ण कविता मिळवा. **अशा किमान तीन ‘पूर्ण कविता’ ‘छात्र प्रबोधन’कडे पाठवा व आकर्षक बक्षीस मिळवा.** आपण आपल्या कविता ई-मेल किंवा पोस्टाद्वारे पाठवू शकता. पाकिटावर आपले पूर्ण नाव, पत्ता, इयत्ता, दूरभाष क्रमांक यांचा उल्लेख अवश्य करावा! तुम्हाला कविता शोधायला सोपं जावं यासाठी ज्या कवींच्या कवितेच्या ओळी आपण तळटिपेत दिल्या आहेत, त्या कवींची नावे खाली दिली आहेत.

१) कुसुमाग्रज २) शांता शेळके ३) इंदिरा संत ४) ग. दि. माडगूळकर ५) यशवंत मनोहर ६) शंकर वैद्य ७) दत्ता हलसगीकर ८) मंगेश पाडगावकर ९) रमण रणदिवे १०) निर्मला देशपांडे ११) संदीप खरे

**छात्र प्रबोधनच्या अंकातील शेजारील चौकट ज्या लेखांच्या सुरुवातीला दिली आहे त्या लेखांशी निगडित ऑडिओ/व्हिडीओ इंटरनेटद्वारा आपल्या संगणकावर कसे ऐकावे/पाहावे याच्या सूचना खाली दिल्या आहेत. त्याप्रमाणे कृती करुन लेखांच्या वाचनाबरोबरच पूरक साहित्याचा आनंद घ्या.**

| Tag No. ActiveLink | ऑडिओ/ व्हिडिओ ऐका/पाहा |
|---|---|

**View multimedia content on your Computer or on the Mobile/Tablet**

Instructions to use ActiveLink on PC and Mobile/Tablet:

**1.** Go to http://www.activel.in **2.** You can use your PC as well as your tablet/mobile (Smartphone).
**3. Insert the ‘tag’ number** given with the article in Chhatra Prabodhan and **click ‘search’** for audio/video.

**टॅग नंबरसाठी पाहा मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य, पान क्र. –१९, २९**

टपटप आले थेंब टपोरे। त्या स्पर्शाने अंग शहारे।।



**जरूर शोधा...** www.calligraphycentre.com. (सुलेखनाविषयी)

**सहभागी व्हा ! मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल** - युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४



# पाऊले चालती पंढरीची वाट...

आषाढ महिना सुरू झाला, की वेध लागतात पालख्यांचे! 'ज्ञानेश्वर माऊली, ज्ञानराज माऊली तुकाराम' च्या जयघोषाबरोबर लाखो वारकरी विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने अनेक किलोमीटर अंतर पायी तुडवत पंढरपूरला जातात. गेल्या वर्षी अशा असंख्य पावलांबरोबर आम्ही ज्ञान प्रबोधिनीच्या इ. १० वी मुलीही सहभागी झालो होतो. सगळ्या वारकऱ्यांबरोबर आळंदी-पुणे हा टप्पा पार करताना खूप काही शिकायला मिळालं, खूप काही अनुभवायला मिळालं. पुण्यातून आम्ही आळंदीत पोहोचलो. तिथलं ते प्रसन्न आणि भक्तीमय वातावरण खूपच छान होतं. प्रत्येक माणसाला 'माऊली' म्हणजेच आपली 'आई' म्हणणं खरोखरच वेगळं होतं, विचार करायला लावणारं होतं. आळंदीत घेतलेलं ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचं दर्शन, वारकऱ्यांबरोबर केलेला नाच, 'विठोबा रखुमाई'चा जयघोष, रात्री इंद्रायणीत सोडलेले दिवे, ऐकलेलं कीर्तन, सगळंच केवळ अविस्मरणीय !

आळंदीहून पुण्याला येताना त्या लाखो विठ्ठल भक्तांबरोबर अभंग, भजनं गात, त्यांच्याशी गप्पा मारत, मध्येच रस्त्यात नाचत, 'माऊली - माऊली' चा घोष करत असताना फारच धमाल येत होती. त्याचबरोबर त्यात वारकऱ्यांची विठ्ठलावरची वेडी भक्ती, श्रद्धा, विश्वास आणि त्यांचा पंढरीचा ध्यास सगळं अगदी जवळून जाणवत होतं.

प्रत्येक दिंडीचे नियम, चालीरिती, प्रथा वेगळ्या होत्या; पण तुळशीवृंदावन, पताका, अभंग आणि मुख्य म्हणजे विठुरायावरची भक्ती अगदी सारखीच होती. या




दिंडीतून त्या दिंडीत जाताना एक वेगळाच आनंद होत होता; कारण प्रत्येकाचं प्रेम आणि श्रद्धा आम्हाला समजत होती.

वारीत जवळपास ७०० दिंड्या होत्या. प्रत्येक दिंडीत साधारण ३०० वारकरी होते. एवढ्या सगळ्या लोकांमध्येही गर्दी, गोंगाट, कलकल कधीच वाटली नाही. मधे एक रिंगण झालं; पण तेव्हाही सगळ्यांमध्ये समन्वय खूप छान होता. रिंगणात कोणीही काहीही न सांगता एकत्र आले आणि वेगळेही झाले. तो शिस्तबद्ध सोहळा अवर्णनीय होता. 'दिंड्या पताका वैष्णव नाचती, पंढरीचा महिमा वर्णावा किती?' याचा अनुभव तिथं पदोपदी येत होता. सगळेच वारकरी १९ दिवस आपलं घर-दार, शेती-वाडीचा विसर पडून वारीत तल्लीन झाले होते. एखादं ध्येय सामूहिकरित्या साध्य करायचं असेल तर तहानभूक विसरून, श्रद्धेनं, शिस्तीत, एकमेकांना मदत करत आणि एकमेकांची काळजी घेत ते ध्येय साध्य होऊ शकतं; याचा अनुभव वारीनं मला दिला. कित्येक जण आळंदी-पंढरपूर दरवर्षी वारीबरोबर जातात. काही जणांना विठ्ठलाचं दर्शन होतं तर काही नुसता कळस बघूनच माघारी येतात. पण दर्शन न घडलेल्यांना कसलंही दुःख नसतं. त्यांना संपूर्ण वारीत विठ्ठलच दिसलेला असतो आणि त्यांना त्यांच्या भक्तीचं, श्रद्धेचं आणि कष्टाचं पूर्ण समाधान असतं.

मला या वारीतून जातिपंथापलीकडची समानता दिसून आली. शिस्त आणि ध्येय प्राप्तीसाठीचे कष्ट जाणवले. त्यातला एखादा तरी संस्कार आपल्या अंगी बाणू दे हीच विठ्ठलचरणी प्रार्थना! मग, यावर्षी तुम्हीसुद्धा हा वारीचा अनुभव घेण्यासाठी वारकऱ्यांबरोबर एखादा टप्पा गाठण्यासाठी सिद्ध होणार ना?

❊❊❊

**- कु. मृण्मयी परळीकर** (इ. १० वी)
अ-४०२, चिंतामणी कोर्ट,
३२० शनिवार पेठ, पुणे ३०



बरसल्या श्रावणधारा, धरणी भिजवायला। हिरवी झाली सृष्टी सारी, नवचैतन्य उजळायला।।



**जरूर शोधा...** www.learncalligraphy.co.uk. (सुलेखन शिकण्याविषयी)

**७वी ते ९वीच्या मुलामुलींसाठी- सामूहिक विद्याव्रत संस्कार** - संत्रिका व संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२

# सुसंगती सदा घडो...

– कु. सायली मुळ्ये



*सुसंगति सदा घडो,*
*सुजन वाक्य कानी पडो।*
*कलंक मतिचा झडो,*
*विषय सर्वथा नावडो ।।*

खरोखरच, योग्य वयात उत्तम संगत मिळण्यासारखे भाग्य नसते. म्हणूनच वरील श्लोकातसुद्धा चांगली संगत लाभावी, गुणीजनांचे बोल कानी यावेत, बुद्धी स्वच्छ व्हावी आणि जगातील वाईटाची वृत्ती नष्ट व्हावी, अशी प्रार्थना केली आहे. संगतीचा एक विलक्षण संस्कार आपल्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो. म्हणूनच 'संगत ही माणसाच्या जीवनाला कलाटणी देणारी बाब आहे,' असे म्हटले जाते. एखाद्या ठिकाणी जाताना आपण वाट चुकलो तर काही वेळ आपण घाबरतो, गांगरतो पण परत मूळ वाटेचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो; तसंच संगतीच्या बाबतही वाईट संगतीच्या वाटेवर चालू लागलो तर मात्र अनर्थ होतो. आणि मग परत चांगल्या वाटेवर प्रयत्नपूर्वक चिकाटी ठेवून यावे लागते.

कोणत्याही गोष्टीचा लोभ हा वाईटच. आजच्या काळात प्रलोभनं ठायी-ठायी आहेत. वाईट विचारांना बळी पडणाऱ्यांची संख्या वाढताना दिसत आहे. या सगळ्यांचे एकमेव कारण म्हणजेच आजच्या काळातील माणूस हा सुसंगतीपासून दूर चालला आहे. आणि वाईट संगतीला आपलेसे करत आहे. 'Show me your company. I will tell you your future' मला आपली संगत दाखवा, मी आपल्याला आपले भविष्य सांगतो. हे विधान खूपच महत्त्वाचे व अर्थपूर्ण आहे.

संगतीचे महत्त्व स्पष्ट करणारी पोपटांची गोष्ट आपणास माहीतच असेल. एकाच वेळी दोन पोपट दोन वेगवेगळ्या व्यक्तींकडे विकले जातात. एक गुणी पंडिताकडे तर दुसरा व्यसनी माणसाकडे. काही वर्षांनी पोपट विक्रेता आपण विकलेली पोपटाची पिल्ले किती मोठी झाली आहेत हे पाहायला जातो. तेव्हा गुणी पंडिताकडील पोपट, 'नमस्कार. या बसा,' असे म्हणत त्याचे स्वागत करतो, तर व्यसनी माणसाकडील पोपट शिव्यांच्या फैरी झाडून त्याचे स्वागत करतो. तो विक्रेता चपापतो. एकाच घरट्यातील पिल्लांच्या स्वभावातील फरक पाहून तो गांगरतो.

गोष्ट अत्यंत साधी आणि छोटीशी आहे. पण त्यातून मिळणारा बोध हा अत्यंत मोठा आहे. पक्षी जर इतके बदलतात मग आपण तर माणसे आहोत. प्रत्येक व्यक्तीने आपली मैत्री पारखूनच करावी.

आपण बालपणी अत्यंत अनुकरणप्रिय असतो, त्या वेळी चांगल्या वाईटाची पुरेशी समज नसते. हे मान्य आहे. मात्र ऐन तारुण्यात एखाद्या व्यसनाच्या संगतीतून उभ्या आयुष्याची राखरांगोळी केलेले अनेक तरुण आपण पाहतो. 'एकच सिगारेट ओढ, त्यात काय मोठंसं!' असं सांगून काही मुलं निर्व्यसनी मुलांना बिघडवू पाहतात. त्यात अनेक मुले फसतातही. म्हणूनच मित्र-मैत्रिणींची योग्य निवड करता येणं गरजेचं आहे.

ज्याप्रमाणे कुसंगतीने बिघडलेल्या मुलांची उदाहरणे आहेत. त्याचप्रमाणे सुसंगतीने घडणारी मुलेही अनेक आहेत. संतसंगत, ग्रंथसंगत याने अनेक मुलांवर चांगले परिणाम केले आहेत. हुशार, जिद्दी, उत्साही

मित्रपरिवार आपल्यालाही प्रेरणा देतो. एखादे साहित्यप्रेमी, कलाकार यांच्या संगतीत आपलेही मन, फुलते. नवीन आशा, उमेद निर्माण होते. एकमेकांना चांगले विचार सुचविले जातात, सांगितले जातात. यातूनच सर्वांचा विकास होतो. एकूणच काय आपली संगत ही कामाशी एकनिष्ठ असणारी, अभ्यासू, उत्साही, चांगल्या विचारांनी भारलेली हवी. कारण आपल्या याच संगतीतून आपली 'दशा आणि दिशा' ठरत असते. 'संगत हे असे जीवन गाणे आहे की जे आपल्याला ताल देऊ शकते आणि सुरेख जीवनाचा तोल बिघडवूही शकते.' यशवंत पाटणे यांचे हे वाक्य खूप छान धडा देते. संगतीचे महत्त्व सांगताना 'आम्ही बि घडलो–तुम्ही बि घडा ना...' हे वचन आहे. पण बिघडायचे ते कसे?

*'परिसाच्या संगे लोह बिघडले*
*लोह बिघडले, सुवर्णचि झाले'*

त्यामुळेच आपण संगत




परिसाची धरावी, मग सोन्याहून अनमोल क्षण आपल्या हाती येतील.

❋❋❋


**– कु. सायली मुळ्ये** (इ. ९ वी)
फाटक हायस्कूल, रत्नागिरी
***चित्रकार** – कु. पल्लवी गाडगीळ*

---


## या फुलपाखरात दडलंय काय?

**शेजारील फुलपाखरात बारा सुप्रसिद्ध लेखकांच्या बारा पुस्तकांची नावे उभी–आडवी दडलेली आहेत. ती शोधा पाहू.**

('यशोघट' हस्तलिखितातून साभार)



(उत्तर अंकात अन्यत्र)



(उत्तर अंकात अन्यत्र)

### जरा डोकं चालवा...


पुढील आकृतीत ११ काड्यांच्या साहाय्याने ३ चौरस बनवले आहेत. आता त्या आकृतीतील कोणत्याही ३ काड्या अशा हलवा की, त्यामुळे २ वेगवेगळ्या आकाराचे चौरस तयार होतील.

सरींच्या तालात ऐकतो, मनातील गाणे। तृणपात्यांच्या ललित नर्तनी, थेंबांची पैंजणे ।।



**जरूर शोधा...** www.foodfood.com. (विविध पाककृतींचे व्हिडिओज्, माहिती)

**UPSC** परीक्षा पूर्वतयारी वर्ग - स्पर्धा परीक्षा केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४



Tag No. CP131048 ActiveLink | व्हिडिओ पाहा

# घंटा बोले कुलपाला...



– कु. साक्षी नानोटे

**दोन सजीवांमध्ये संवाद घडला तर ते नवल काय? पण जर दोन निर्जीव वस्तू बोलायला लागल्या तर? तर मजा येईल ना? आणि तो संवाद जर वादविवाद स्पर्धेसारखा रंजक असला तर दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल ! चला तर मग ऐकूयात घंटाश्री काय म्हणतेय कुलपाला...**
**तुम्ही पण तुमची कल्पनाशक्ती वापरा आणि दोन निर्जीव वस्तूंमधला चटपटीत संवाद लिहून काढा. पुढे काय करायचं, ते तुम्हाला सांगायला नकोच! संवाद लिहून झाला, की ताबडतोब 'छात्र प्रबोधन' कडे पाठवा. निवडक संवाद 'छात्र प्रबोधन'मधून प्रसिद्ध केले जातील.**

शाळा सुरू व्हायला एकच दिवस उरला होता. दाराला अडकवलेले कुलूप सुस्तावले होते. घंटा आनंदात लोलक वाजवत कुलपाचे लक्ष वेधून घेत होती. ती मुलं येणार म्हणून आनंदात होती.

**कुलूप :** घंटाश्री, तुझा घंटानाद खूप दिवसांनी माझ्या कानावर पडणार आहे.

**घंटा :** अरे कुलूपदादा, उद्या पुन्हा सारेजण येतील; दर तासाने मला वाजवतील. सगळी शाळा परत सजीव झाल्यासारखी वाटेल; पण तुझा चेहरा का रे असा उदासवाणा दिसतो?

**कुलूप :** अगं घंटाश्री, तुझं तर ठीक आहे गं. पण आम्हाला कोण बघतंय? येऊन–जाऊन कुलूप मी! माझी नुसती ओढाताण होते. एकदा मला दाराला अडकवलं, की कुणी सुद्धा फिरकत नाही माझ्याकडे! शिवाय माझं सगळं जीवन किल्लीवर अवलंबून! ती हरवली, की मी बाद!! ही मुलं किल्ली कुठेतरी हरवतात आणि माझी किल्लीबरोबरची जोडी फोडतात!

**घंटा :** अरे दादा, शेवटी ही मुले लहानच. त्यांच्या मनात तुला त्रास देण्याचा कोणताही हेतू नसतो. ही मुले अगदी खट्याळ आहेत; पण त्यांचे मन अगदी निरागस आहे.

**कुलूप :** तू म्हणतोस ते सगळं खरं आहे. पण मुलांच्या जाचाला कंटाळलो आहे मी. मला सर्वजण तुच्छतेने वागवतात; पण तू मात्र भाग्यवान आहेस. तुझा मधल्या सुट्टीचा एक ठोका ऐकताच मुलांच्या चेहऱ्यावर आनंद पसरतो.

**घंटा :** अरे कुलूपदादा, पण...

**कुलूप :** पण काय घंटाश्री? अखेर तूही मान्य केलंच ना? माझ्या नशिबी लाचारीचे जिणे आले आहे. बाकी काही नाही.

**घंटा :** स्वत:ला कमनशिबी समजू नकोस. तूही भाग्यवानच आहेस. इतक्या दिवसांपासून तुझे बंद असलेले तोंड आता पुन्हा उघडले जाईल. याचा तुला आनंद नाही झाला का?

**कुलूप :** खरं आहे गं घंटाश्री, पण... तू या शाळेची कशी अविभाज्य घटक बनलीस, तसा मी कधीच बनू शकलो नाही.

**घंटा :** तुझा 'नन्ना चा पाढा' तू काही सोडणार नाहीस. कोणत्याही गोष्टीकडे सकारात्मक दृष्टीनं पाहायला शीक. आता माझंच बघ. मुलं माझं लोलक वारंवार वाजवून, शाळेची शिस्त बिघडवतात. मला याचा त्रास होतोच ना! पण तरीही शाळेला जिवंतपणाही ही मुलेच आणतात. म्हणूनच मी त्यांची आतुरतेनं वाट पाहत आहे.

**कुलूप :** मला पटवण्याचा प्रयत्न करू नकोस. मी माझ्या



बिजली करी सोनेरी तांडवे, मृदुंग घुमतो मेघांचा। समृद्धीचा पूर आणती, सूर रुपेरी रेघांचा।।

**जरूर शोधा...** www.swimmingfederation.in (जलतरणाच्या स्पर्धांविषयी मार्गदर्शन)




**छात्र प्रबोधन मासिकाचे सभासद व्हा व त्यातील उपक्रम, स्पर्धेत भाग घ्या** - छा. प्र. ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१०६

निर्णयावर ठाम आहे. तू शाळेच्या आत ऐषोरामात पहुडलेली असतेस. तुला नेहमी स्वच्छ ठेवले जाते; पण मी मात्र शाळेच्या बाहेर गाड्यांचे कर्कश आवाज ऐकत, धूळ खात लटकलेला असतो. माझे काही महत्त्वच नाही मुळी.

**घंटा :** अरे कुलूपदादा, कळतच नाही बघ तुला. तू या शाळेचा रक्षणकर्ता आहेस. सीमेवर देशाचे रक्षण करण्यासाठी उभ्या असलेल्या सैनिकांप्रमाणे तू आहेस. शाळेचे संरक्षण करण्याची मोठी जबाबदारी तू समर्थपणे पेलीत आहेस. मुलांना शिक्षणाची दारे तू खुली करतोस. वाईट प्रवृत्तींना शाळेत येण्यापासून रोखतोस. ही शाळा आहे म्हणून तर ही मुले आहेत; म्हणूनच तू आहेस आणि मी देखील आहे. तुझं अस्तित्व या शाळेमुळे टिकून आहे.

**कुलूप :** (स्वत:चं महत्त्व कळल्यानं भारावलेल्या अवस्थेत) अरे, हे तर माझ्या ध्यानातच आले नाही. तुझ्याकडून आज मी एक गोष्ट नक्कीच शिकलो आहे. प्रत्येक गोष्टीचा निश्चित एक उपयोग आहे. जीवनाकडे नेहमी सकारात्मक दृष्टीनंच बघायला हवं. सकारात्मक दृष्टिकोन जोपासायला हवा.




**घंटा :** बोलण्यात वेळ कसा गेला कळलंच नाही. दिवस मावळायला आला आहे; पण वेळ वाया गेला याची खंत नाही. कारण आज मी कोणाला तरी, त्याचं स्वत:चंच महत्त्व पटवून दिलं आहे.

**कुलूप :** धन्यवाद घंटाश्री !

❋❋❋

**– कु. साक्षी नानोटे** (इ. ९ वी)
बाल शिवाजी माध्यमिक शाळा, अकोला


**खाली दिलेल्या कवितेत एक गुप्त संदेश लपवला आहे. कोणता ते शोधा पाहू...**

निरखून पाहिले असता दिसला केवळ हाहाकार
रास्त भावाच्या दुकानातही होती मारामार
शारदेचे पूजकही झाले आता स्वार्थी
वास्तव झाले आहे भीषण एका अर्थी
दरवेळी एक पुढे अन् दहा पावले मागे घेतो
सोडूनी सारी बंधने पुन्हा त्यातच अडकतो
डावलून दुसऱ्यास वरचढ बनण्याचा करतो प्रयास
आता तरी प्रामाणिकपणाची धरूया नक्की आस
शापातून या अविकासाच्या मुक्ती होईल नक्की
वाट अवघड असली तरी जिद्द आहे पक्की
दीनदुबळ्यांना घेऊन चढूया विकासाची पायरी
बनवण्यास देश समर्थ पूर्ण आहे तयारी
नाउमेद न होता करूया बात उद्याची

**– कु. साक्षी नानोटे**
बालशिवाजी माध्यमिक शाळा, जठारपेठ, अकोला

**❋ अभिनंदन ❋**

**'छात्र प्रबोधन'तर्फे अनुभवसंपन्न आणि आनंददायी सुट्टीसाठी व्यक्तीकार्य** या उपक्रमाचे आवाहन सौर चैत्र व वैशाख शके १९३५ (एप्रिल, मे २०१३) च्या अंकात प्रसिद्ध केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देऊन आपला सभासद **चि. कौशिक रविंद्र कुलकर्णी** (पंढरपूर) याने यशस्वीरित्या **२१ कामे पूर्ण केली**. त्याला 'छात्र प्रबोधन'ची **वार्षिक वर्गणी तीन महिने वाढवून मिळाली.** म्हणजेच 'छात्र प्रबोधन'चे तीन अंक त्याने बक्षिस मिळवले. त्याचे हार्दिक अभिनंदन!!



(पान क्र. २८ वरील 'जरा डोकं चालवा' या कोड्याचे उत्तर)

हासरा, नाचरा, जरासा लाजरा, सुंदर साजिरा, श्रावण आला।।



**जरूर शोधा...** www.learnsculpture.org (शिल्पकला)

**सहभागी व्हा, अनुभव घ्या - सुट्टीमधील जोडीकार्ये -** छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१७४

# *हा... हा... हा...   हा... हा... हा...*




‘‘एक दुकानदार नोकरीसाठी आलेल्यांची वैद्यकीय तपासणी करून मगच त्यांना नोकरीवर ठेवतो.’’

‘‘अच्छा! कसलं दुकान आहे त्याचं?’’

‘‘मिठाईचं, अन् वैद्यकीय तपासणीत; ज्याला मधुमेह आहे असं दिसून येतं, त्यालाच नोकरीवर ठेवतो तो!!’’

— — — — — — — — — — — — — —



एकदा रस्त्याने दोन डॉक्टर जात होते. समोरून एक माणूस लंगडत येत होता. त्याला पाहून,

**पहिला डॉक्टर :** अंदाज कर, की हा माणूस का लंगडत असेल?

**दुसरा डॉक्टर :** त्याच्या कमरेच्या हाडात दोष असेल.

**पहिला डॉक्टर :** नाही. त्याच्या पायाच्या हाडात दोष असेल.

ते डॉक्टर शेवटी त्या माणसालाच विचारतात. त्यावर तो माणूस म्हणतो, ‘‘अहो! माझी चप्पल तुटली आहे.’’

— — — — — — — — — — —




**अडाणी व्यक्ती (स्टेशन मास्तरला) :**
भाऊ, नाशिकला जाणारी रेल्वे कधी येईल?

**स्टेशन मास्तर :** ९ वाजून ३० मिनिटांनी

**अडाणी व्यक्ती :** कमालच करता तुम्ही पण! जेव्हा मन करेल तेव्हा वेळ बदलता... ही रेल्वे तर साडेनऊला जायची.

— — — — — — — — — — — — — —

## *थोडीशी गंमत...*

**खालील कोड्यात टाकणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधा पाहू...**

- ❊ अनुभवी डॉक्टर्सही ‘प्रॅक्टिस’ का करतात?
- ❊ कॉम्प्युटर (MS-OS असल्यास) बंद करण्यासाठी ‘स्टार्ट’ वर का क्लिक करावे लागते?
- ❊ आपला जन्म इतरांसाठी झाला असेल, तर इतर लोक कशासाठी जन्मलेत?
- ❊ शेंगदाणा तेल शेंगदाण्यापासून, सूर्यफूल तेल सूर्यफुलापासून, ‘कोकोनट ऑईल’ नारळापासून बनते, तर मग ‘बेबी ऑईल’ कशापासून बनवतात?
- ❊ जंगलात राहणाऱ्या ‘टारझन’ला दाढी का नव्हती?
- ❊ २१ ला ‘ट्वेंटी वन’ म्हणतात, ३१ ला ‘थर्टी वन’, ४१ ला ‘फोर्टी वन’, ५१ ला ‘फिफ्टी वन’ म्हणतात तर ११ ला ‘वन्टी वन’ का नाही म्हणत?

(पान क्र. २८ वरील ‘या फुलपाखरात दडलंय काय?’ या कोड्याचे उत्तर– मृत्युंजय, अग्निपंख, श्यामची आई, डेबू, सावर रे!, स्वामी, पडघवली, ययाती, गुगली, कऱ्हेचे पाणी, काळेपाणी, किमयागार)

ओले पावसाने दरवळले, अस्वस्थ फुलांचे घोस। ओलांडून आला गंध, निस्तब्ध मनाची वेस।।

**जरूर शोधा...** www.indiachoreographers.in/western.html (नृत्याविषयी)



**नागरीवस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम -** नागरीवस्ती अभ्यासगट, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - हर्षाताई ☎ ९३२५२७२३३७

मागील चार वर्षांपासून 'छात्र प्रबोधन' वाचत आहे. त्यात छापून येणाऱ्या विविध कथा, माहितीपर लेख, कोडी, विनोद वाचायला खूप मजा येते. त्यामुळे कुमारांचे मनोरंजन होते. 'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी अंकातील मोठमोठ्या लेखकांचे लेख व गोष्टी खूप रंजक असतात. त्यामुळे लेखनशैली सुधारण्यास मदत होते. त्यामुळे 'छात्र प्रबोधन'चा अंक जास्तीत जास्त मुलांपर्यंत पोहोचवण्याचा मी प्रयत्न करतो.

**– चि. सुशांत दिवेकर** (इ. ९ वी)

❋

मी गेली चार ते पाच वर्षं 'छात्र प्रबोधन' सातत्याने वाचत आहे. त्यातल्या गोष्टी, कविता, विनोद, इ. फार छान व मनोरंजक असतात. त्यात माहिती देणारी सदरे पण खूप असतात. त्यातील काही लेख वाचल्यानंतर आपणही काहीतरी लिहिण्याचा प्रयत्न करावा, असेही वाटते. मुलांना लिहितं करण्यासाठी दर महिन्याच्या अंकामध्ये काही पानं मुलांसाठी राखून ठेवली जातात. तसंच हस्तलिखित स्पर्धांसारखे उपक्रम राबवून मुलांच्या चित्रकला, लेखनकला, संपादन कौशल्याला संधी दिली जाते. 'छात्र प्रबोधन' असंच चालू राहावं ही इच्छा आहे.

**– चि. अथर्व सुपनेकर** (इ. ९वी)

❋

# कुमारांच्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'

**छात्र प्रबोधन**
**२० वर्षांची वाटचाल**

'छात्र प्रबोधन'शी खरी ओळख झाली, ती आठवीत. त्याआधी 'छात्र प्रबोधन' वाचण्यापेक्षा (तो ही फक्त दिवाळी अंक!) 'छात्र प्रबोधन' दिवाळी अंकाची कोणाची किती विक्री होते' यातच लक्ष असायचं. आठवीत अभ्यासासाठी 'छात्र प्रबोधन' हातात आलं आणि वैविध्यपूर्ण साहित्याशी मैत्री व्हायला लागली. कथांचे इतके प्रकार असतात, सगळेच माहितीपर लेख कंटाळवाणे नसतात, असं लक्षात आलं. त्यानंतर मी अंक नियमित वाचू लागले. नवीन साहित्यिक, त्यांच्या विविध शैली, घरच्या घरी करता येतील असे विज्ञानप्रयोग, दैनंदिन जीवनाशी निगडित लेखमाला आणि अशा अनेक बहरदार लेखांमुळे 'छात्र प्रबोधन'शी एक छानसं नातं तयार झालं. हे नातं असंच अधिकाधिक दृढ होईल, याची मला नक्कीच खात्री वाटते.

**– कु. पल्लवी गाडगीळ** (इ. १२ वी)

❋

*'छात्र प्रबोधन' साकारण्यात*
*आहेत अनेकांचे कष्ट,*
*नावीन्य, वैविध्य यांसारखी*
*अनेक आहेत वैशिष्ट्य*
*अंकाची मांडणीही आहे उत्कृष्ट,*
*म्हणून सांगते स्पष्ट, की*
*'छात्र प्रबोधन' वाचून*
*फळ मिळेल इष्ट*

**– कु. सायली नगरकर** (इ. १० वी)


❋

**⁕ श्रद्धांजली ⁕**



सगळ्यांच्या चेहऱ्यावर धकाधकीच्या जीवनात हसू खुलवणारा चिंटू मुका झाला...
२२ वर्षे चिंटूचे संवाद लिहिणारे अष्टपैलू कलाकार **श्री. प्रभाकर वाडेकर** यांचे दि. १५ जून २०१३ या दिवशी दु:खद निधन झाले.
त्यांना **छात्र प्रबोधन**तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.


हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० आषाढ, शके १९३५, १ जुलै २०१३ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे –२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.







# कुमार चित्रकारांच्या कुंचल्यातून...




चित्रकार : १. कु. अनुष्का तळणीकर  २. चि. पार्थ बापट  ३. चि. शिवम वास्के

सौर आषाढ, शके १९३५/ जुलै २०१३, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

# प्रकाशचित्रे निसर्गाची...

**चि. मल्हार परळीकर** (इ. चौथी)









**चि. वरद बनसोड** (इ. नववी)

**सौर दिनदर्शिका शके १९३५**

| | जुलै २०१३ | आषाढ श्रावण |
|---|---|---|
| सो. | 1 | १० |
| मं. | 2 | ११ |
| बु. | 3 | १२ |
| गु. | 4 | १३ |
| शु. | 5 | १४ |
| श. | 6 | १५ |
| र. | 7 | १६ |
| सो. | 8 | १७ |
| मं. | 9 | १८ |
| बु. | 10 | १९ |
| गु. | 11 | २० |
| शु. | 12 | २१ |
| श. | 13 | २२ |
| र. | 14 | २३ |
| सो. | 15 | २४ |
| मं. | 16 | २५ |
| बु. | 17 | २६ |
| गु. | 18 | २७ |
| शु. | 19 | २८ |
| श. | 20 | २९ |
| र. | 21 | ३० |
| सो. | 22 | ३१ |
| मं. | 23 | श्रा. १ |
| बु. | 24 | २ |
| गु. | 25 | ३ |
| शु. | 26 | ४ |
| श. | 27 | ५ |
| र. | 28 | ६ |
| सो. | 29 | ७ |
| मं. | 30 | ८ |
| बु. | 31 | ९ |

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
**या अंकाची किंमत : ₹ १५/-**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-**
**प्रकाशन दिनांक :**
सौर १० आषाढ, शके १९३५
१ जुलै २०१३
**www.chhatraprabodhan.org**
**ई-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -